दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–३४ | बुधवार दि.२२ एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### मंत्रालयातील 'लेकुरे' आणि व्यवस्थेची ढासळती शिस्त...!

महाराष्ट्राच्या सत्तेचे केंद्र असलेले मंत्रालय हे एकेकाळी धोरणनिर्मिती, प्रशासनिक निर्णय आणि लोकहिताच्या कामांचे मुख्य केंद्र मानले जात होते. मात्र, आज त्या मंत्रालयात दिसणारी गर्दी आणि तिचे स्वरूप पाहता एक वेगळेच वास्तव समोर येते. ही गर्दी आता सामान्य जनतेची उरलेली नाही; उलट ती कार्यकर्त्यांची, इच्छुक ठेकेदारांची, दलालांची आणि त्यांना सोबत घेऊन येणाऱ्या लोकप्रतिनिधींची बनली आहे. सत्तेभोवती निर्माण झालेल्या या 'लेकुरांच्या' वर्तुळाने मंत्रालयाचे रूपच बदलून टाकले आहे.

# ९ जिल्ह्यांत 'पंतप्रधान धनधान्य कृषी योजना' लागू !

## पालघर ते बीडपर्यंत जिल्ह्यांचा समावेश; राज्य व जिल्हा स्तरावर समित्या गठित, ५ वर्षांत सर्वांगीण कृषी विकासाचा आराखडा

मुंबई । वृतसंस्था

**राज्यातील पालघर, यवतमाळ, गडचिरोली, धुळे, रायगड, चंद्रपूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड आणि बीड या ९ जिल्ह्यांमध्ये 'पंतप्रधान धनधान्य कृषी योजना' राबविण्यास अखेर प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला असून, योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य व जिल्हा स्तरावर समित्यांचीही स्थापना करण्यात आली आहे.**



केंद्र सरकारने २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात देशातील कमी उत्पादनक्षमता, मध्यम पीक तीव्रता आणि कमी कर्जवाटप असलेल्या १०० आकांक्षित जिल्ह्यांचा विकास करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील या ९ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत शेती उत्पादन वाढविणे, पिकांमध्ये विविधता आणणे, शाश्वत कृषी पद्धतींचा अवलंब करणे, साठवणूक क्षमता वाढविणे, सिंचन सुविधा सुधारणा आणि शेतकऱ्यांना अल्प व दीर्घ मुदतीचे कर्ज उपलब्ध करून देणे यावर भर दिला जाणार आहे. तसेच, ग्रामपंचायत व तालुका स्तरावर पायाभूत सुविधा मजबूत करण्याचेही उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. ही योजना पुढील ५ वर्षे केंद्र व राज्य योजनांच्या अभिसरणातून 'प्रोजेक्ट मोड'मध्ये राबविली जाणार आहे. राज्य स्तरावरील समितीचे अध्यक्ष मुख्य सचिव असतील, तर जिल्हा समितीचे अध्यक्ष संबंधित जिल्हाधिकारी असतील. जिल्हा कृती आराखड्याद्वारे सर्व योजना एकत्रित करून निधीची उपलब्धता, वेळेवर वितरण आणि विभागांमधील समन्वय यावर विशेष लक्ष दिले जाणार आहे. यामध्ये केवळ उत्पादनच नव्हे, तर विपणन, ब्रँडिंग आणि मूल्यवर्धनालाही प्राधान्य ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### जपान इतर देशांना घातक शस्त्रे विकणार

टोकियो : जपानने दुस-या महायुद्धानंतर आपल्या शांततावादी धोरणात मोठा बदल केला आहे. पंतप्रधान साने ताकाइची यांच्या मंत्रिमंडळाने घातक शस्त्रास्त्रांच्या निर्यातीवरील दशकांपूर्वीची बंदी उठवली आहे. यानुसार आता जपान फायटर जेट, क्षेपणास्त्रे आणि युद्धनौका यांसारखी शस्त्रे इतर देशांना विकू शकेल.मंगळवारीजपानच्या संरक्षण मंत्रालयाने सांगितले की, अनेक देश जपानी शस्त्रे खरेदी करण्यात स्वारस्य दाखवत आहेत. अलीकडेच जपान आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात ७ अब्ज डॉलरचा करार झाला आहे. यानुसार मित्सुबिशी हेवी इंडस्ट्रीज ऑस्ट्रेलियाई नौदलासाठी ११ पैकी पहिल्या ३ युद्धनौका बनवेल. यापूर्वी १९७६ मध्ये लागू केलेल्या तरतुदींनुसार, जपान केवळ गैर-घातक लष्करी उपकरणांचीच निर्यात करू शकत होता.

### नांदेडच्या कुख्यात गँगस्टरला हैदराबादमधून अटक

नांदेड: नांदेडमध्ये वर्चस्वाच्या लढाईतून झालेल्या गँगवार प्रकरणात एक मोठी अपडेट समोर आली आहे. या घटनेतील फरार असलेला 'साईलाला' गँगचा आरोपी शाहरुख उर्फ कबुतर आणि त्याचा अन्य एक सहकारी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात अडकला आहे. मागील पंधरा दिवसांपासून तो फरार होता. विशेष म्हणजे, पोलिसांच्या हाती लागू नये यासाठी तो हैदराबादमध्ये वेशभूषा बदलून राहत होता. ''मी कबुतर आहे, गुन्हा केल्यानंतर पळून जातो'' असे आव्हान त्याने पोलिसांना दिले होते; मात्र पोलिसांनी शिताफीने त्याला ताब्यात घेतले.भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ई-स्केअर कॅनॉल रोड परिसरात ४ एप्रिल रोजी मध्यरात्री 'साईलाला' आणि 'सदा' गँगच्या सदस्यांमध्ये गँगवार झाले होते. चित्रपट पाहून परत जात असताना सदा गँगच्या अर्जितसिंह चव्हाण याच्यावर साईलाला गँगच्या सदस्यांनी पाळत ठेवून हल्ला केला.

# दिल्लीत भाऊ-भाऊ म्हणतात आणि पाय खेचतात-गडकरी

नवी दिल्ली । वृतसंस्था

**इराणचे माजी प्रमुख अय्यातुल्ला खामेनी यांचं मूळ लखनऊ जवळचे आहे, याची माहिती त्यांनी आपल्याला दिली होती अशी आठवण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितली. मराठी माणसाचा साधेपणा आणि स्पष्टपणा दिल्लीत नाही, इकडे भाऊ-भाऊ म्हणतात आणि पाय खेचतात असंही गडकरी म्हणाले. देशाच्या सहमहालेखा नियंत्रक सुप्रिया देवस्थळी यांच्या 'दिल्ली डायरी' या पुस्तकाचं नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रकाशन झालं. यावेळी नितीन गडकरी यांनी त्यांच्या अनेक आठवणी सांगितल्या.**



दिल्लीत कशाचेही डुप्लिकेट असू शकते, नितीन गडकरींचेही ते डुप्लिकेट बनवू शकतात अशी मिश्कील टिप्पणी गडकरींनी यावेळी केली. त्यांच्या या वक्तव्याला उपस्थितांनी हसून दाद दिली. नितीन गडकरी म्हणाले की, ''भारत विकसित करत असलेल्या छाबाहार बंदराच्या कामासाठी इराणला जायचो त्यावेळी अय्यातुल्ला खामेनी यांची भेट व्हायची. एका भेटीवेळी खामेनी यांनी सांगितलं की, त्यांची पर्शियन ▶▶ पान २ वर

### मराठी लोक दिल्लीत येत नाहीत

मराठी सस्कृती चांगली आहे. पण काही गोष्टीत आपण विचार करायला पाहीजे. फुले, शाहू, आंबेडकर यांनी राज्याला दिशा दिली. छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळकांनी दिशा दिली. मराठी भाषा, साहित्य, संस्कृतीचं महत्त्व महाराष्ट्राबाहेर राहिल्यावर लक्षात येतं, असं गडकरी म्हणाले.

# साहेबांनी पाया रचला अन दादांनी कळस चढवला

## सांगता सभेत सुनेत्रा पवारांकडून शरद पवारांचा उल्लेख




बारामती । प्रतिनिधी

गेल्या अनेक दिवसांपासून संपूर्ण राज्याचे लक्ष वेधून घेणारी बारामती विधानसभेची पोटनिवडणूक आता अंतिम टप्प्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे रिक्त झालेल्या या जागेसाठी आज प्रचाराची सांगता सभा पार पडली. या ऐतिहासिक सभेत बोलताना सुनेत्रा पवार यांनी, ''आदरणीय पवार साहेबांचे आशीर्वाद आमच्यासाठी अत्यंत मोलाचे आहेत,'' असे विधान केले. त्यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात मोठ्या चर्चांना उधाण आले आहे.

अजितदादांच्या निधनानंतर कोसळलेल्या दुःखाच्या डोंगरातून सावरत सुनेत्रा पवार यांनी केवळ कुटुंबाचीच नव्हे, तर राज्याची जबाबदारीही समर्थपणे पेलली आहे. त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर पक्षाच्या अध्यक्षपदाची धुराही आपल्या खांद्यावर घेतली. आता स्वतः उमेदवार म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या सुनेत्रा पवारांनी प्रचाराच्या शेवटच्या दिवशी शरद पवारांचा केलेला उल्लेख राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.''अजित दादांना सर्वप्रथम मनापासून वंदन करते. आपल्याला सर्वांना माहिती आहे या निवडणुकीमध्ये सर्वच पक्षाने दिलेल्या पाठिंब्याबद्दल सुरुवातीलाच मी सर्वांचेच मनापासून आभार मानते. ▶▶ पान २ वर

# लातूर पॅटर्नचे जनक, माजी खा. डॉ. गोपाळराव पाटील यांचे निधन

लातूर । प्रतिनिधी



**राज्याच्या शैक्षणिक क्षेत्रात लातूर पॅटर्न चांगलाच गाजला, या पॅटर्नमागे अनेकांचं डोकं आणि कार्य राहिलेलं आहे. याच लातूर पॅटर्नला राज्यभरात ओळख मिळवून देणारे ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, माजी खासदार आणि शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील यांचे आज सकाळी निधन झाले, ते ९४ वर्षांचे होते.**

माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दुःखद आहे. शिक्षण, वैद्यकीय क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान अतिशय मोठे होते. वैद्यकीय सेवांमुळे त्यांना लोक 'देवमाणूस' म्हणायचे. त्यांच्या शिक्षण संस्थेमुळे लातूरला राष्ट्रीय स्तरावर शैक्षणिक ओळख प्राप्त झाली. मलाही या शिक्षण संस्थेत कार्यक्रमाच्या निमित्ताने जाण्याची संधी मिळाली. मराठवाड्यातील ▶▶ पान २ वर

# आजपासून जमिनीची एन ए प्रक्रिया सुलभ

## बीपीएमएस प्रणाली; ऑनलाइन अधिमूल्य भरण्याची सुविधा

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात जमिनीच्या बिगरशेती वापरासाठी आवश्यक असलेली अकृषिक रुपांतरण प्रक्रिया अधिक सुलभ आणि पारदर्शक करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते इमारत परवानगी व्यवस्थापन प्रणाली चे लोकार्पण करण्यात आले.

या नव्या प्रणालीमुळे नागरिकांना अकृषिक रुपांतरण अधिमूल्य ऑनलाइन भरता येणार असून, त्याची नोंद थेट ७/१२ उताऱ्यावर होणार आहे. मंत्रालयात पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे ▶▶ पान २ वर



### पुढील सुधारणा युद्धपातळीवर

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेयांनी सांगितले की, बीपीएमएसच्या धर्तीवर ऑटो डीसीआर प्रणालीमध्येही आवश्यक सुधारणा करण्यात येत आहेत. पुढील १० दिवसांत ही प्रक्रिया पूर्ण होईल, ज्यामुळे मोठ्या विकास प्रकल्पांच्या मंजुरीला अधिक वेग मिळणार आहे.

### पारदर्शकता आणि गती वाढणार

यापूर्वी नागरिकांना अकृषिक परवानगी मिळवण्यासाठी अनेक महिने प्रतीक्षा करावी लागत होती. मात्र ही प्रक्रिया डिजिटल केल्यामुळे मानवी हस्तक्षेप कमी होणार असून पारदर्शकता वाढणार आहे. १० फेब्रुवारीच्या शासन निर्णयातील तरतुदींना या प्रणालीमुळे गती मिळणार आहे.

# बीड एसपीना मॅटचा धक्का

## अनेक बदल्यांना स्थगिती

बीड । प्रतिनिधी

**मागील वर्षी बीडच्या पोलीस अधीक्षकांनी घाऊक स्वरूपात केलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या वादग्रस्त ठरल्या होत्या.अनेक कर्मचाऱ्यांनी या बदल्यांना महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात (मॅट) आव्हान दिले होते. त्यातील १८ बदल्या मॅटने रद्द केल्या आहेत.पोलीस अधीक्षकांच्या भूमिकेला ही सणसणीत चपराक मानली जात आहे.**



बीडच्या पोलीस अधीक्षकांनी मागच्या वर्षी शेकडो कर्मचाऱ्यांच्या घाऊक बदल्या केल्या होत्या. एकाचवेळी इतक्या मोठ्या प्रमाणावर बदल्यांची ही पहिलीच वेळ होती. स्वग्राम,खंडीत अखंडित आदींच्या नावाखाली कर्मचाऱ्यांच्या करण्यात आलेल्या बदल्यांमुळे पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी होती. ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.२१ एप्रिल २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २०९.५० क्विंटल | २,१०० | २,५८१ | २,२८७ |
| ज्वारी/हायब्रिड: २१२.०० क्विंटल | १,५२० | ३,५७१ | २,२९८ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ६.०० क्विंटल | ७,४०१ | ७,४०१ | ७,४०१ |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: १६७.५० क्विंटल | २,१०१ | २,६१० | २,३२२ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १३६.५० क्विंटल | ५,५०० | ५,५११ | ५,५०५ |
| हरभरा: ९.५० क्विंटल | ५,२५१ | ५,२५१ | ५,२५१ |

# महिलांचा हक्क नाकारण्याची किंमत विरोधकांना मोजावी लागेल-पंकजा मुंडे

## ठाण्यात पत्रकार परिषद;महिला आरक्षणाला विरोध हे अत्यंत निषेधार्ह

मुंबई । प्रतिनिधी

**महिला आरक्षण विधेयक नाकारले गेले, तेव्हा देशातील प्रत्येक महिलेला प्रताडित करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्याचा केंद्रबिंदू म्हणजे वंचितांना मुख्य प्रवाहात आणणे हा आहे. महिलांचा हक्क नाकारणे हे अत्यंत निषेधार्ह असून काँग्रेससह सर्व विरोधकांना याची किंमत मोजावी लागेल असा इशारा राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज पत्रकार परिषदेतून दिला. काँग्रेस पक्ष देशाला स्वतःची मालमत्ता समजतो, हीच त्यांची मानसिकता आहे' असंही त्यांनी स्पष्ट केलं.**




ठाणे येथे भाजप विभागीय कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ना. पंकजाताई मुंडे बोलत होत्या. भाजप नेत्या माधवी नाईक, जिल्हाध्यक्ष संदीप लेले तसेच समीरा भारती, स्वप्नाली साळवी, वंदना डोंगरे, वनिता बोथपगारे आदी महायुतीचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. 'नारी शक्ती वंदन अधिनियमा'ला विरोध करणाऱ्या काँग्रेस व अन्य विरोधी पक्षांच्या भूमिकेचा ना. पंकजाताईंनी यावेळी निषेध केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने आणलेल्या ऐतिहासिक 'नारी शक्ती वंदन अधिनियमा'ला विरोध करून काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांनी देशातील कोट्यवधी महिलांच्या आकांक्षांचा आणि हक्कांचा घोर अवमान केला आहे.वर्षानुवर्षे महिला आरक्षणाचे प्रश्न प्रलंबित ठेवणाऱ्या विरोधकांनी संसदेत या विधेयकाविरोधात भूमिका घेऊन आपली महिलाविरोधी मानसिकता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश महिलांच्या सक्षमीकरणासाठी पावले उचलत असताना, विरोधकांचा ▶▶ पान २ वर

# रोहित पवारांनी टाळलं; पण सुप्रिया सुळे थेट व्यासपीठावर

पुणे । प्रतिनिधी

**बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या प्रचाराच्या सांगता सभेच्या निमित्ताने आज बारामतीमधील शारदा प्रांगणात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकारी अध्यक्ष खासदार सुप्रिया सुळेंची उपस्थिती लक्षवेधी ठरली. काही दिवसांपासून सुनेत्रा पवार यांच्या प्रचारासाठी सगळ्यांची चढाओढ लागली होती. आमदार रोहित पवार यांनी तीन दिवस प्रचार केला. मात्र महायुतीच्या व्यासपीठावर जाणार नाही अशी भूमिका घेत सांगता सभेला येणार नसल्याचे सांगितले. मात्र सुप्रिया सुळे यांना सुनेत्रा पवार यांनी फोन केला आणि सुळे थेट या व्यासपीठावरच आल्या.**



सुप्रिया सुळे गेल्या काही दिवसांपासून आपल्याला निमंत्रण नसल्याचे सांगत होत्या. मात्र सुप्रिया सुळे यांना सुनेत्रा पवार यांनी फोन केला आणि सुप्रिया सुळे या थेट या कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार असल्याचे सांगत बारामतीत पोहोचल्या. खरे तर हे व्यासपीठ पूर्णतः महायुतीच्या नेत्यांचे होते. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरचंद्र पवार पक्षाच्या इतर नेत्यांनी आम्ही आमचा उमेदवार उभा केलेला नाही. मात्र सुरुवातीच्या किंवा सांगता सभेला जाण्याची आवश्यकता नाही असे स्पष्ट केले होते. ▶▶ पान २ वर

अग्रलेख

# मंत्रालयातील ‘लेकुरे’ आणि व्यवस्थेची ढासळती शिस्त...!

महाराष्ट्राच्या सत्तेचे केंद्र असलेले मंत्रालय हे एकेकाळी धोरणनिर्मिती, प्रशासनिक निर्णय आणि लोकहिताच्या कामांचे मुख्य केंद्र मानले जात होते. मात्र, आज त्या मंत्रालयात दिसणारी गर्दी आणि तिचे स्वरूप पाहता एक वेगळेच वास्तव समोर येते. ही गर्दी आता सामान्य जनतेची उरलेली नाही; उलट ती कार्यकर्त्यांची, इच्छुक ठेकेदारांची, दलालांची आणि त्यांना सोबत घेऊन येणाऱ्या लोकप्रतिनिधींची बनली आहे. सत्तेभोवती निर्माण झालेल्या या ‘लेकुरांच्या’ वर्तुळाने मंत्रालयाचे रूपच बदलून टाकले आहे.

प्रत्येक आमदार, प्रत्येक लोकप्रतिनिधी आपल्या कार्यकर्त्यांना सांभाळण्यासाठी आणि स्वतःची राजकीय ताकद दाखवण्यासाठी झटत आहे. या कार्यकर्त्यांना टिकवून ठेवण्यासाठी त्यांना काहीतरी ‘दाखवणे’ आणि ‘देणे’ आवश्यक ठरते. इथेच सुरू होते ती साखळी कामे मिळवून देण्याची. ही कामे म्हणजे टेंडर, सब–टेंडर किंवा कधी कधी विना–टेंडर दिली जाणारी लहान–मोठी कामे. परिणामी, मंत्रालयात कामासाठी नव्हे, तर काम ‘मिळवण्यासाठी’ एक वेगळीच स्पर्धा उभी राहिलेली दिसते. यात सर्वात चिंताजनक बाब म्हणजे राज्याची आर्थिक परिस्थिती. एकीकडे कोट्यवधी रुपयांची ठेकेदारांची बिले अडकलेली आहेत, विविध विभागांवर प्रचंड आर्थिक ताण आहे; तर दुसरीकडे नवीन कामांची चढाओढ सुरू आहे. सार्वजनिक बांधकाम विभागावर सुमारे ९० हजार कोटींचे देणे आहे, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या ५० हजार कोटींच्या योजना रखडल्या आहेत, तर इतर खात्यांची स्थितीही फारशी वेगळी नाही. अशा वेळी नवीन कामे कुठून येतात, हा प्रश्न अधिकच गडद होतो. उत्तर स्पष्ट आहे. जिथे संधी मिळेल तिथून ती ‘निर्माण’ केली जाते. या प्रक्रियेत केवळ लोकप्रतिनिधीच नाहीत, तर काही अधिकाऱ्यांचेही ‘माणूस’ म्हणून कार्यकर्ते मंत्रालयात सक्रिय झाल्याचे चित्र आहे. कोणत्या खात्यात फाईल पुढे सरकते आहे, कोणत्या प्रकल्पाला मंजुरी मिळणार आहे, कुठे नवीन काम निघणार आहे. यावर बारकाईने लक्ष ठेवून ही मंडळी सतत फिरताना दिसतात. एका कामामागे अनेकांचे हितसंबंध जोडले जातात आणि त्या कामाभोवती एक अनौपचारिक साखळी उभी राहते. अलीकडच्या काही घटनांनी या साखळीचे कुरूप वास्तव उघड केले. मंत्र्यांच्या दालनात पैसे घेताना झालेली अटक, त्यानंतर व्हायरल झालेले व्हिडिओ, आणि त्याभोवती रंगलेल्या राजकीय चर्चा या सर्व घटनांनी मंत्रालयाच्या प्रतिमेला मोठा धक्का दिला. ‘खरात प्रकरण’ असो किंवा इतर घडामोडी, या सगळ्यांनी एक गोष्ट स्पष्ट केली. मंत्रालय हे केवळ धोरणांचे केंद्र राहिलेले नाही, तर व्यवहारांचे केंद्र बनण्याची भीती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रालयातील गर्दीवर नियंत्रण आणण्यासाठी काही निर्बंध लागू करण्यास सुरुवात केली आहे. प्रवेश मर्यादित करणे, पूर्वपरवानगी अनिवार्य करणे, अनावश्यक वावर रोखणे हे उपाय निश्चितच योग्य आणि आवश्यक आहेत. प्रशासनाच्या दृष्टीने ते शिस्त आणण्याचे प्रयत्न म्हणून पाहिले जाऊ शकतात. परंतु, प्रश्न इतक्यावरच संपत नाही. कारण ही समस्या केवळ गर्दीची नाही; ती प्रवृत्तीची आहे. बाहेरून निर्बंध लावून गर्दी कमी केली, तरी या प्रवृत्तीचा अंत होईल का? की ती फक्त मंत्रालयाच्या गेटबाहेर उभी राहील? खरा बदल हवा असेल, तर तो व्यवस्थेच्या आत घडला पाहिजे. कामांच्या वाटपात पारदर्शकता, निविदा प्रक्रियेत शिस्त, आणि राजकीय हस्तक्षेपावर नियंत्रण. याच संदर्भात समर्थ रामदास यांच्या ओळी अत्यंत बोलक्या वाटतात. ‘‘लेकुरे उदंड जाहली, तो ते लक्ष्मी निघोनी गेली...’’ या ओळींमधून सुचणारा अर्थ आजच्या परिस्थितीला तंतोतंत लागू होतो. जेव्हा सत्तेभोवती ‘लेकुरे’ वाढतात, तेव्हा शिस्त, संपत्ती आणि व्यवस्थापन हळूहळू हाताबाहेर जाऊ लागते. परिणामतः शासनयंत्रणा दुय्यम ठरते आणि निर्णयप्रक्रियेवर अनौपचारिक शक्तींचा प्रभाव वाढतो. आज मंत्रालयात दिसणारी परिस्थिती ही केवळ एका काळाची समस्या नाही, तर दीर्घकालीन व्यवस्थात्मक बिघाडाचे लक्षण आहे. कार्यकर्ते, ठेकेदार, दलाल आणि राजकीय संधी साधणारे घटक हे सगळे मिळून सत्तेभोवती एक ‘अनौपचारिक अर्थव्यवस्था’ तयार करत आहेत. यात सामान्य नागरिकाचा आवाज हरवतो आणि शासनाच्या मूळ उद्दिष्टालाच धक्का बसतो. म्हणूनच, सध्याचे निर्बंध हे पहिलं पाऊल असलं, तरी अंतिम उपाय नाहीत. खरा बदल हवा असेल, तर शासनव्यवस्थेत पारदर्शकता, जबाबदारी आणि कडक अंमलबजावणी यांचा संगम आवश्यक आहे. अन्यथा, ‘लेकुरे’ कमी होणार नाहीत. फक्त त्यांची जागा बदलेल. शेवटी प्रश्न एकच उरतो, मंत्रालय पुन्हा धोरणनिर्मितीचे केंद्र होणार का, की ते व्यवहारांच्या गर्दीत हरवणार? याचे उत्तर आज घेतल्या जाणाऱ्या निर्णयांवर आणि त्याच्या प्रामाणिक अंमलबजावणीवर अवलंबून आहे.

# आ.संदीप क्षीरसागरांनी घेतली महसूलमंत्र्यांची भेट

## अनेक प्रलंबित प्रश्न लागणार मार्गी



बीड । प्रतिनिधी

**बीड विधानसभा मतदारसंघातील महसूल विभागाशी निगडित असलेल्या विविध प्रश्नांच्या अनुषंगाने आ.संदीप क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.२१) रोजी महाराष्ट्र राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली. यावेळी सविस्तर चर्चा होऊन लवकरच प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याबाबत मंत्री महोदयांनी सकारात्मकता दर्शविली.**

बीड जिल्ह्यातील महसूलात वाढ करणे, सुशिक्षित तरूणांना रोजगार उपलब्ध करून देणे तसेच महसूल विभागाचे प्रलंबित प्रकरणे मार्गी लावणे आणि मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजनेंतर्गत बीड मतदारसंघातील वाडी–वस्त्यांच्या रस्त्यांना रस्त्यासाठी भरीव तरतूद करावी, या आणि अशा अनेक महत्वपूर्ण विषयांवर ही बैठक झाली. यावर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सकारात्मकता दर्शवून लवकरच प्रलंबित मार्गी लागणार असल्याचे आश्वासित केले आहे. त्यामुळे लवकरच अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लागणार असल्याचे दिसून येत आहे.

## पेठ बीड पोलिसांची कामगिरी:जनावरे चोरणारी टोळी जेरबंद

# ४.१५ लाखांचा मुद्देमाल जप्त; तिघांना अटक

बीड । प्रतिनिधी

**पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीत जनावरांची चोरी करून कत्तलीसाठी नेणाऱ्या टोळीचा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली असून, त्यांच्याकडून ४ लाख १५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.**



दिनांक २० एप्रिल २०२६ रोजी पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मारुती खेडकर हे पथकासह परिसरात गस्त घालत होते. यावेळी त्यांना माहिती मिळाली की, जी.एन. फंक्शन हॉल परिसरात नागरिकांनी जनावरे चोरणाऱ्या काही व्यक्तींना एका पिकअप टेम्पोसह पकडून ठेवले आहे. माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. ४ लाखांची पिकअप आणि जनावरे जप्त पोलिसांनी घटनास्थळावरून एम.एच.२३ ए.यु. १०१५ क्रमांकाची बोलेरो पिकअप ताब्यात घेतली. या वाहनात गोवंशीय जातीचे गोऱ्हे त्याचे पाय दोरीने बांधलेल्या अवस्थेत आढळून आले. पोलिसांनी १५ हजार रुपये किमतीचे गोऱ्हे आणि ४ लाख रुपयांची बोलेरो पिकअप, असा एकूण ४ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. कत्तलीसाठी चोरी केल्याची कबुली अटकेत असलेल्या आरोपींची नावे खालीलप्रमाणे आहेत: १. अशीम जाफर कुरेशी (रा. महमदीया कॉलनी) २. अजिम आझाद कुरेशी (रा. महमदीया कॉलनी) ३. कुरेशी शहनवाज कुरेशी एजाज (रा. कुरेशी मोहल्ला, पेठ बीड) पोलिसांनी या आरोपींना विश्वासात घेऊन विचारपूस केली असता, त्यांनी कत्तलीसाठी जनावरांची चोरी केल्याची कबुली दिली आहे. याप्रकरणी फिर्यादी सईद अब्दुल करीम कुरेशी (वय ५१, रा. मोमीनपुरा) यांच्या तक्रारीवरून पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा (गु.र.नं. ११६/२०२६) दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. व्यंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मारुती खेडकर, पोलीस उपनिरीक्षक मन्सूर शहा आणि त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. पोलीस हवालदार माने हे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# तीन जिल्ह्यांची कुळदेवता सुभान संतुआई

**बीड जिल्ह्यातील व गेवराई तालुक्यात असणारे शिरसमार्ग येथील जागृत देवस्थान श्री सुभान संतुआई अगाध महिमा असलेली व बीड, जालना व परभणी या तीन जिल्ह्याची कुळदेवता असणारे हे देवस्थान आहे. नवसाला पावणारे देवस्थान अशी भाविकांची श्रद्धा असल्याने येथे बारामाही भाविकांची मोठी गर्दी असते. या मनोकामना पूर्ण करणार्या देवीची वैशाख शुद्ध पंचमीला यात्रा असते. यात्रेनिमित्त पुणे–मुंबईपासुनचे भाविक दरवर्षी येतात.**



शिरसमार्ग गावाजवळ निसर्गरम्य अशा वातावरणात श्रीक्षेत्र सुभान संतुआई देवस्थान आहे. काही काळापूर्वी जुन्या पद्धतीचे असलेले बांधकाम आता ग्रामस्थ व आईच्या भक्तांच्या आर्थिक सहकार्यातून भव्य असे नवीन बांधकाम करण्यात आले आहे. मंदिराच्या दहा ते पंधरा एकर परिसरात वृक्षारोपण व भाविकांना सुविधा करण्यात आलेले आहेत. श्रीक्षेत्र सुभान संतुआईची नवसाला पावणारी देवी अशी भाविकांची श्रद्धा असल्याने येथे यात्रेनिमित्त भाविक नवस पूर्ण करण्यासाठी मोठ्या संख्येने येतात. वैशाख शुद्ध पंचमीला सकाळी गंगाजलाने देवीची महापूजा होते तर रात्री शिरसमार्ग गावातून देवीची भव्य अशी पालखी मिरवणूक निघते. वैशाख शुद्ध षष्ठीला शिरस मार्ग येथे कुस्त्यांचा जंगी आखाडा भरतो. या कुस्त्यांसाठीही तीन ते चार जिल्ह्यातील पैलवान दरवर्षी हजेरी लावतात. सुभान संतवाणी देवस्थान येथे देवीची भक्त चिमाआई हे देवस्थाने आहे. अशी ख्याती आहे की चिमाबाई या मादळमोही येतील महिला भाविक होत्या. त्या दररोज मादळमोही येथून संतु आई येथे दर्शनासाठी येत. चिमाबाई यांची देवीवर मोठी श्रद्धा असल्याने त्या निवर्तल्यानंतर सिरसमार्ग ग्रामस्थांनी चिमाआई यांचेही मंदिर बांधले. संतुआई देवस्थान हे बीडसह जालना व परभणी जिल्ह्यातील अनेक भाविकांची कुळदेवता आहे. त्यामुळे संतु आई येथे लहान मुलांचे जावळ काढण्यासाठी बारमाही दूर दूर होऊन भाविक येतात. या भाविकांसाठीही देवी परिसरात आता पिण्याचे पाणी, निवारा, स्वच्छता ग्रह अशा अनेक सोयी सुविधा करण्यात आलेले आहे. याचबरोबर गेवराई तालुक्यातील सर्वात मोठा सभामंडप या ठिकाणी बांधण्यात आला आहे. त्यामुळे येथे विवाह कार्याची मोठी सुविधा उपलब्ध झाली आहे. त्यामुळे गेल्या काही वर्षात संतुआई देवस्थान येथे विवाह कार्य ही मोठ्या प्रमाणात होत आहेत. शिरस मार्ग येथे येणाऱ्या भाविकांसाठी कोणतीही अडचण येऊ नये यासाठी ग्रामस्थांच्या वतीने देवस्थान परिसरात सतत सोयीसुविधा उभारल्या जात असल्याने भाविकांमधूनही समाधान व्यक्त केल्याचे दिसून येत आहे. सुभान संतवाणी देवीची यात्रा म्हणजे शिरसमार्कसह परिसरातल्या तरटेवाडी शहाजानपूर तांदळवाडी काळेवाडी टाकळगव्हाण पोखरी अशा आठ ते दहा गावांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळते. अक्षय तृतीया दिवशी शिरस मार्ग व परिसरातील भाविक राक्षस भवन येथे गंगेचे पाणी कावडीने आणण्यासाठी जातात. या पाण्याने वैशाख शुद्ध पंचमीला देवीचा जलाभिषेक केला जातो. या उत्साहात शिरसमार्गसह परिसरातील सर्वच गावे सहभागी होत असल्याने या भागात संतुआई यात्रेनिमित्त मोठा उत्साह असल्याचे दिसून येते. या यात्रा उत्साहात बीड जिल्ह्यातील सर्वच भाविकांनी सहभागी व्हावे असे आववाहन शिरसमार्ग ग्रामस्थांच्या वतीने करण्यात येत आहे.

**दिनेश गुळवे, शिरसमार्ग.**

# उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या पुढाकारातून जम्मू-कश्मीरमधील आदिल हुसैन शाह यांच्या कुटुंबाला नवीन घर

## युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या विशेष प्रयत्नांतून कार्यक्रम यशस्वी

बीड । प्रतिनिधी

जम्मू–कश्मीरमधील, पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यात पर्यटकांना वाचवताना स्वतःचा जीव धोक्यात घालून अद्वितीय शौर्य दाखवत प्राणार्पण करणारे आदिल हुसैन शाह यांच्या कुटुंबाला महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांनी दिलेला शब्द प्रत्यक्षात उतरवला आहे. त्यांच्या कुटुंबासाठी नवीन, सुसज्ज घर बांधून देण्यात आले असून, त्या घराचे ऑनलाईन उद्घाटन उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते पार पडले. या प्रसंगी मंत्री संजय शिरसाट साहेब, राज्यमंत्री योगेशजी कदम, कॅप्टन अभिजीतजी अडसूळ, युवासेना सचिव विकास गोगावले, युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर, काश्मीर संभाग शिवसेना अध्यक्ष मोहम्मद शफी मगरे तसेच अनेक पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या उपक्रमामागे युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांचे विशेष प्रयत्न असून, त्यांच्या पाठपुराव्यामुळे हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरीत्या पूर्णत्वास गेला. सामाजिक बांधिलकी जपत एका वीर कुटुंबाला आधार देण्याचा हा प्रयत्न सर्वत्र कौतुकास्पद ठरत आहे. आदिल हुसैन शाह यांच्या शौर्यपूर्ण बलिदानाची आठवण ठेवत, त्यांच्या कुटुंबाला सुरक्षित आणि सन्मानाने जीवन जगता यावे, या हेतूने उभारण्यात आलेले हे घर केवळ एक निवारा नसून मानवतेचा जिवंत संदेश देणारे प्रतीक ठरत आहे. या घटनेमुळे समाजात सहकार्य, संवेदनशीलता आणि कर्तव्यभावना यांचा आदर्श निर्माण झाला असून, गरजूंच्या मदतीसाठी पुढे येण्याची प्रेरणा या उपक्रमातून मिळत आहे.

## पान १ वरून...

### ९ जिल्ह्यांत ‘पंतप्रधान धनधान्य

दिले जाणार आहे. योजनेच्या अंमलबजावणीचा त्रैमासिक आढावा घेतला जाणार असून, निधी वितरण, पदभरती आणि विविध विभागांचे सहकार्य यावरही काटेकोर नियंत्रण ठेवले जाणार आहे. एकंदरीत, या योजनेमुळे संबंधित ९ जिल्ह्यांतील शेती क्षेत्राला नवे बळ मिळून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

----------------

### साहेबांनी पाया रचला

आदरणीय पवार साहेब व सौ सुप्रियाताई यांचे मी विशेष आभार मानते. तसेच ज्या ज्या संस्था संघटनांनी मला उस्फूर्तपणे जाहीर पाठिंबा दिला आहे, त्या सर्वांचे मी ऋण व्यक्त करते. हा पाठिंबा म्हणजे बारामतीच्या भवितव्याबद्दलची एकत्रित बांधील आहे, असं मी मानते,‘‘ असं पवार यावेळी म्हणाल्या.आज मी इथे उभी आहे महायुतीचा उमेदवार म्हणून फक्त उमेदवार म्हणूनच नाही. तर एक अपूर्ण राहिलेल्या स्वप्नांची जबाबदारी घेऊन. दादा गेले पण त्यांची स्वप्न अजून जिवंत आहेत. ती स्वप्न पूर्ण करण्यासाठी मी आज रणांगणामध्ये उतरलेली आहे.

-------------

### दिल्लीत भाऊ–भाऊ म्हणतात

भाषा ही संस्कृतमधून आली आहे. तसेच त्यांचे मूळ हे लखनऊ जवळ असल्याचंही खामेनी म्हणाले होते.नितीन गडकरी म्हणाले की, ‘‘मला कधीच दिल्लीत राहायची इच्छा झाली नाही. एकाने त्याचं कारण विचारलं. त्यावर, तिथे आलू पराठाशिवाय काहीच मिळत नाही असं मी सांगितलं. मराठी माणसाचा साधेपणा, स्पष्टपणा दिल्लीत नाही. इकडे भाऊ भाऊ म्हणतात आणि पाय खेचतात.‘‘नितीन गडकरी म्हणाले की, ‘‘मराठी माणसाची विशेषता आणि मानसिकता मर्यादीत आहे. दिल्ली आणि मुंबईतील भौगोलिक अंतर किती आहे त्यापेक्षा मानसिकता महत्त्वाची आहे. मराठी लोक दिल्लीत येत नाही, अधिकारी दिल्लीत येत नाहीत. मुंबईत येण्याचा रस्ता आहे, पण परत जाण्याचा नाही. कोणीही मुंबईत आला की तो परत जात नाही.

----------------

### बीड एसपीना मॅटचा धक्का

अनेकांनी या बदल्यांना मॅट मध्ये आव्हान दिले होते.त्याची सुनावणी देखील दीर्घकाळ चालली.यात आता अखेर मॅटने निर्णय दिला असून तब्बल १८ बदल्या रद्द करण्यात आल्या आहेत.मॅटने कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसाठी एकाच जागी ५ वर्ष हा निकष आहे, मात्र स्वग्राम आणि खंडित अखंडित सेवा असे निकष लावता येणार नाहीत असे स्पष्ट केले आहे. आता या निर्णयाचा इतरही अनेक बदल्यांवर परिणाम होऊ शकतो. या प्रकरणात पोलीस कर्मचाऱ्यांच्या वतीने विधिज्ञ ओ.डी. माने,अमोल चाळक आदींनी बाजू मांडली. बाळकृष्ण जायभाये, संगीता शिरसाट, कृष्णा जायभाय, संतोष गाडे, रामहरी भंडाने, माधव भागवत, रेखा पवार, सौदागर सावंत, सुभाष क्षीरसागर, सुसेन पवार, परमेश्वर शिंदे, प्रकाश गायकवाड, दत्तात्रय उबाळे, उस्मान शेख, संजयकुमार राठोड, सचिन जायभाये, तानाजी डोईफोडे, मनोज घोडके

**मृत्यूनंतर एकाला मिळाला न्याय**

बीडच्या इतिहासात कदाचित पहिल्यांदाच कर्मचारी मॅटमध्ये गेल्यानंतर सव्वा वर्ष कर्मचाऱ्यांना न्यायाची प्रतिक्षा करावी लागली.दुर्दैवाची गोष्ट म्हणजे मॅटने दिलासा दिलेल्या लोकांमध्ये बाळकृष्ण जायभाय यांच्या देखील बदलीचे आदेश रद्द केले मात्र त्यांनी काही दिवसापूर्वीच आत्महत्या केली होती. स्वतःचा जीव गमवाल्यानंतर मॅटने त्यांना न्याय दिला, त्यामुळेच विलंबाने दिलेला न्याय म्हणजे न्याय नाकारणे या वाक्याचा प्रत्यय येत आहे.

---------------

### आजपासून जमिनीची एन

जमीन व्यवहार आणि बांधकाम प्रक्रियेत मोठा बदल होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील सुधारणांनंतर शासनाने अकृषिक वापराबाबत निर्णय घेतला होता. त्याची अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्यासाठी बीपीएमएस प्रणाली आजपासून कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रणालीमुळे नागरिकांना विकास परवानगी आणि बांधकाम आराखडे मंजूर करतानाच एकाच ठिकाणी रूपांतरण अधिमूल्य भरण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.या प्रणालीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे बिगरशेती वापरासाठी आवश्यक असणारे एकरकमी अधिमूल्य आता पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने भरता येणार आहे. त्यामुळे नागरिकांना सरकारी कार्यालयात जाण्याची गरज उरणार नाही. अधिमूल्य भरल्यानंतर त्याची माहिती महसूल विभागाच्या संगणकीय प्रणालीशी जोडली जाईल आणि सातबारा उताऱ्यावर त्याची नोंद आपोआप होणार आहे.

--------------

### लातूर पॅटर्नचे जनक, माजी खा.

अनेक होतकरू विद्यार्थ्यांना त्यांनी डॉक्टर, अभियंते म्हणून घडवले, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्रद्धांजली वाहिली आहे.३ ऑक्टोबर १९३१ रोजी धाराशिव जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील कवठा येथे त्यांचा जन्म झाला. त्यांनी ओस्मानिया विद्यापीठ येथून एमबीबीएस आणि डीसीएच पदवी प्राप्त केली. बालरोगतज्ज्ञ म्हणून त्यांनी लातूरमध्ये दीर्घकाळ सेवा दिली.राजकीय क्षेत्रातही डॉ. गोपाळराव पाटील यांचे योगदान महत्त्वपूर्ण राहिले. मराठवाड्यात भारतीय जनता पार्टी चा पाया मजबूत करण्यात त्यांची भूमिका मोठी होती. लातूर लोकसभा मतदारसंघातून त्यांनी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांच्याविरोधात अनेक निवडणुका लढवल्या. १९९१ ते १९९९ दरम्यान त्यांनी चार वेळा लोकसभा निवडणूक लढवली. १९९८ मधील निवडणूक अत्यंत चुरशीची ठरली होती. तसेच १९९४ ते २००० या कालावधीत त्यांनी राज्यसभेचे सदस्य म्हणून काम पाहिले. वाणिज्य, परराष्ट्र व्यवहार आणि रेल्वे यांसारख्या महत्त्वाच्या संसदीय समित्यांवर त्यांनी काम केले.

-----------

### रोहित पवारांनी टाळलं; पण

त्यानंतर आमदार रोहित पवार, त्यांचे वडील राजेंद्र पवार, युगेंद्र पवार यांच्या मातोश्री शर्मिला पवार, रोहित पवार यांच्या आई सुनंदा पवार यांनी वेगवेगळ्या सभा देखील घेतल्या. मात्र राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने महायुतीच्या अंतिम सभेला कोणीही उपस्थित राहणार नाही असे सुरुवातीला स्पष्ट केले जात होते व आमदार रोहित पवार यांनी तर आपण निमंत्रण आले आणि नाही आले तरी देखील उपस्थित राहणार नाही असे स्पष्ट केले होते.मात्र खुद्द पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षाच या सभेला उपस्थित राहिल्याने राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त केले जात होते. काही दिवसांपूर्वीच खासदार सुप्रिया सुळे यांनी देवेंद्र फडणवीस हे नरेंद्र दाभोळकरांच्या वारसानुसार काम करत असल्याचे प्रशस्तीपत्र दिले होते. त्यामुळे सुप्रिया सुळे यांचा प्रवास नेमका भाजपच्या कलाने सुरू आहे का असा प्रश्न देखील उपस्थित केला जात आहे.

----------------

### महिलांचा हक्क नाकारण्याची किंमत

हा अडथळा देशातील जनता कधीही विसरणार नाही असं त्या म्हणाल्या. महिला सक्षमीकरण आणि लोकशाही बळकट करण्यासाठी भारतीय जनता पक्ष कटिबध्द आहे, महिलांना त्यांचे हक्क मिळावेत यासाठी या महिलांविरोधी शक्तीविरूध्द आम्ही जोरदार लढा देऊ असं त्या म्हणाल्या. कॉंग्रेस, समाजवादी पक्ष, टीएमसी आणि डीएमके या पक्षांनी केवळ घटनादुरुस्ती किंवा मतदारसंघ पुनर्रचना विधेयकांनाच विरोध केला नाही तर त्यांनी भारतातील लाखो माता–भगिनी आणि मुलींचा विश्वासघात केला आहे असा आरोप ना. पंकजाताईंनी केला.

---------------------------------

# परभणीत अनोळखी महिला अन् पुरुषाने घेतला गळफास

परभणी । प्रतिनिधी

जिल्ह्याच्या पिंपळगाव ठोंबरे येथील शेतशिवारात झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत एका अनोळखी महिला व पुरुषाचे मृतदेह आढळून आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. याबाबत माहिती मिळताच स्थानिकांनी व पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून हा प्रकार आत्महत्या की घातपात, याबाबत तर्क–वितर्कांना उधाण आले आहे. दरम्यान, गावातील कुणाचेही मृतदेह नसल्याने ह्या दोन्ही व्यक्ती नेमक्या कोण आहेत, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

महिला आणि पुरुषाचा मृतदेह आढळून आल्याने अनेक तर्कवितर्क लढवले जात असून हे प्रेमीयुगुल आहेत की, आणखी काही अशीही शंका उपस्थित होत आहे. पिंपळगाव ठोंबरे येथील संबंधित शेतशिवारात काही दिवसांपासून दुर्गंधी पसरत असल्याची बाब ग्रामस्थांच्या लक्षात आली. त्यानंतर शोध घेतला असता झाडाला लटकलेल्या अवस्थेत दोघांचे मृतदेह आढळून आले. या घटनेने ग्रामस्थ हादरून गेले. प्राथमिक अंदाजानुसार, ही घटना सुमारे सात ते आठ दिवसांपूर्वी घडली असावी. दोघांनी ओढणीच्या साह्याने गळफास घेतल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले. मात्र, नेमकी घटना आत्महत्येची आहे की अन्य काही कारण आहे, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच दैठणा पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक जायभाये, पोलीस उपनिरीक्षक विशाल सूर्यवंशी आणि कर्मचारी बळीराम मुंडे यांच्या पथकाने घटनास्थळी पंचनामा केला. मृतदेहांची अवस्था पाहता ते काही दिवसांपासून झाडावर लटकलेले असल्याचे दिसून आले.दरम्यान, पोलिसांनी दोन्ही मृतदेह ताब्यात घेऊन पुढील तपासासाठी आणि उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा शासकीय रुग्णालय, परभणी येथे पाठवले आहेत. या घटनेचा पुढील तपास सुरू असून, मृतांची ओळख पटविण्याचे कामही सुरू आहे.

## थोडक्यात



### अंबाजोगाई माहेश्वरी तालुका कार्यकारिणी जाहीर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजेगाई तालुका माहेश्वरी कार्यकारिणीची २०२६ ते २०२९ साठी नविन पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड

अंबाजोगाई माहेश्वरी महासंघा कडून २०२६ ते २०२९ साठी तालुका माहेश्वरी मंडळाची निवड बिन विरोध झाली यावेळी नगराध्यक्ष नंदकिशोरजी मुंदडा यांची उपस्थिती होती. तालुका अध्यक्ष म्हणून पुरुषोतम( राजु) रांदड उपाध्यक्ष जगदीश जाजु , प्रविण बजाज, कोषाध्यक्ष रामानुज मुंदडा, सचिव ईश्वर लोहिया, सहसचिव पवन तापडीया, संतोष सारडा( घाटनांदुर) संघटनमंत्री मुन्ना सोमाणी, प्रसार मंत्री संजय लोहिया( पत्रकार) यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. ही निवडणूक खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. निवडणुक अधिकारी म्हणून ललित बजाज व संतोष भंडारी यांनी काम पाहिले. नविन कार्यकारिणीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन जुन्या कार्यकारिणीकडून स्वागत करण्यात आले. यावेळी बीडजिल्हा माहेश्वरी अध्यक्ष ललित तोष्णीवाल , सचिव जगदीश जाजु ,तालुका माजी अध्यक्ष दत्तप्रसाद लोहिया, सचिव सतीष तोष्णीवाल आदी पदाधिकारी तसेच लोहिया,मुंदडा, रांदड ,बजाज,नावंदर, चोकडा,तापडिया, बाहेती,गिल्डा, सोमाणी,सारडा , सोनी,दरगड,मंत्री, भुतडा, बांगड,जाजू , आदीसह इतर समाज बांधव उपस्थित होते

### रोजंदारी मजदुर सेनेच्या लढ्याला यश ! लेखी पत्र दिल्यामुळे तुर्त आंदोलन स्थगित – मनोहर मुंडे



परळी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी,नगरपरिषद/ नगरपंचायत यांच्या अधिनस्त कंत्राटी कामगारांना शासनाने निर्धारित केलेले किमान वेतन व अनुषंगिक लाभ मिळवून देण्यासाठी मागील १४ वर्षापासून रोजंदारी मजदुर सेनेच्या वतीने भाई गौतम आगळे सर यांच्या झुंजार नेतृत्वाखाली लढा उभा केला होता त्या लढ्याला आज नगरपरिषद प्रशासनाने लेखी पत्र देऊन मागण्या मंजूर केल्या मंजूर केल्यामुळे लढ्याला यश मिळाले असे एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले. १३ एप्रिलला तीन महिन्याच्या थकीत वेतन अदा केले होते परंतु कर्मचारी भविष्य निर्वाह निधी ची रक्कम कामगारांच्या नावावर जमा झाली किंवा नाही हे जर तपासायचा असेल तर कर्मचारी भविष्य निर्वाह निधी चा यु एन ए नंबर प्राप्त झाल्यानंतर सर्व माहिती ऑनलाईन असल्यामुळे मोबाईलवर कर्मचारी भविष्य निर्देशाची रक्कम आणि तंत्रज्ञाने भरलेली रक्कम हा संपूर्ण वृत्तांत एक येत असल्यामुळे कामगारांचे रक्कम द्यावे असे पत्र मिळाल्यास मी आंदोलन स्थगित करील असे त्यांना कळवले त्या अनुषंगाने नगरपरिषद आस्थापनेने पत्र तयार करून नगराध्यक्ष पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांनी लेखी पत्र देऊन एक महिन्यात जर ते अपराधपर केलेली आढळून आल्यास मी माझा शब्द देते या सर्व गोष्टी मी आहे तोपर्यंत आपणास मिळून देईल असे आश्वासन दिल्यामुळे तसेच जिल्हा सह आयुक्त नगरपरिषद प्रशासन जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांनी सुद्धा संबंधित मुख्याधिकाऱ्यांना तात्काळ कर्मचारी भविष्य निर्वाह निधीची माहिती या कार्यालयास देऊन तसा अनुपालन अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा आणि उपोषण करण्यापासून परावर्त करावे असे पत्र दिल्यामुळे सदरील आंदोलन स्थगित करण्यात आले असल्याची माहिती रोजंदारी मजदूर सेनेचे बीड जिल्हा अध्यक्ष सुनील कांबळे व शहराध्यक्ष मनोहर मुंडे यांनी संयुक्त प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# मराठी पत्रकार परिषदेच्या राष्ट्रीय अधिवेशनात मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्याकडून वैद्यकीय मदत कक्षाचे कौतुक

## आरोग्य कक्षप्रमुख डॉ.राजेश इंगोले यांची पत्रकारांसाठी वैद्यकीय मदत कक्षाची संकल्पना ; ३५० पत्रकारांची तपासणी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या उदगीर येथे नुकत्याच आयोजित केलेल्या ४४ व्या राष्ट्रीय अधिवेशनात मराठी पत्रकार परिषदेचे महाराष्ट्र राज्याचे आरोग्य कक्षप्रमुख डॉ.राजेश इंगोले यांच्या अभिनव संकल्पनेतून या राष्ट्रीय अधिवेशनात पत्रकारांसाठी आरोग्याची समस्या निर्माण झाल्यास आपत्कालीन व बाह्य रूग्ण विभाग असलेला वैद्यकीय मदत कक्ष स्थापन करण्यात आला होता. मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्याकडून वैद्यकीय मदत कक्षाचे कौतुक केले. या कक्षाच्या माध्यमातून ३५० पत्रकारांची तपासणी करण्यात आली.

अधिवेशना दरम्यान एखाद्या पत्रकाराला आरोग्याची काही समस्या निर्माण झाल्यास त्याला तात्काळ वैद्यकीय मदत मिळावी यासाठी हा कक्ष स्थापन करण्यात आला होता अशी माहिती मराठी पत्रकार परिषदेचे वैद्यकीय कक्षप्रमुख डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी दिली. या अभिनव उपक्रमाचे मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त माननीय एस.एम.देशमुख यांनी कौतुक करीत डॉ.राजेश इंगोले यांचे अभिनंदन केले. पत्रकारांच्या आरोग्यांप्रती संवेदनशील असणारा डॉक्टर या शब्दांत एस.एम.देशमुख यांनी डॉ.इंगोले यांचे कौतुक केले. यावेळी प्रत्यक्ष एस.एम.देशमुख यांनी या वैद्यकीय मदत कक्षाला भेट देऊन, पाहणी करत व यांश कक्षात स्वतःची आरोग्य तपासणी करून या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. यावेळी बोलताना मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी पत्रकारांनी आपले आरोग्य जपले पाहिजे. कारण, जीवनातील ताण–तणावामुळे व पत्रकार यांच्या





धकाधकीच्या आयुष्यामुळे पत्रकारांना त्यांच्या आरोग्याकडे लक्ष देणे सहजपणे शक्य होत नाही. त्यामुळे अनेक पत्रकारांवर आरोग्याकडे केलेल्या दुर्लक्षामुळे अकाली डायबेटीस, रक्तदाब व इतर गंभीर आजारांना तोंड द्यावे लागते. नियमित तपासणी केल्यास या मोठ्या आजारांना वेळीच प्रतिबंध केला जाऊ शकतो. डॉ.राजेश इंगोले यांच्या माध्यमातून मराठी पत्रकार परिषदेला सक्षम असा वैद्यकीय कक्ष प्रमुख मिळाला आहे. आगामी काळामध्ये प्रत्येक तालुक्यामध्ये मराठी पत्रकार परिषदेच्या वैद्यकीय कक्षाची स्थापना डॉ.राजेश इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली करून पत्रकारांच्या आरोग्याला जपण्याचे काम मराठी पत्रकार परिषद करणार असल्याचे सुतोवाच मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी यावेळी केले. महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यामध्ये वैद्यकीय कक्षाची कार्यकारणी लवकरच डॉ.इंगोले हे जाहिर करणार आहेत अशी माहिती श्री.देशमुख यांनी यावेळी दिली. अधिक माहिती देताना वैद्यकीय कक्षप्रमुख डॉ.राजेश इंगोले यांनी मुख्य विश्वस्त देशमुख सरांच्या सूचनेनुसार महाराष्ट्रामध्ये प्रत्येक तालुक्यात पत्रकारांसाठी वैद्यकीय कक्ष स्थापन केला जाणार आहे. तालुकास्तरीय कार्यकारणीच्या निवडी लवकरच घोषित करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. वैद्यकीय कक्षाच्या मदतीने महाराष्ट्रामध्ये पत्रकारांसाठी वर्षातून एकदा मोफत आरोग्य तपासणी शिबिर तसेच आवश्यक असलेल्या रक्त तपासण्या ही मोफत करून देणार असल्याची माहिती डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी प्रसिद्धी माध्यमांना दिली. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, राज्यअध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, शिवराज काटकर, सुरेश नाईकवाडे, मन्सूर भाई शेख, रवी उबाळे, अनिल वाघमारे, शोभा जयपुरकर, दीपक केतके, संदीप कुलकर्णी यांच्यासह संयोजन समितीचे सचिन शिवशेट्टी, युवराज धोत्रे, विभीषण, अर्जुन जाधव, सिद्धार्थ सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ.राजेश इंगोले यांचा हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी दत्तात्रय अंबेकर, पुनमचंद परदेशी, अशोक दळवे, आरेफ सिद्दीक्की, नय्युम शेख, मुशीर बाबा, प्रशांत मस्के, शेख फेरोज, संजय रानभरे, विरेंद्र गुप्ता, एम.एम.कुलकर्णी, एस.व्ही.जोशी, वैद्यकीय कर्मचारी मनोज इंगोले, समता मनोहर, तुषार मनोहर यांनी परिश्रम घेतले. यावेळी तब्बल ३५० पत्रकार बांधवांची आरोग्य तपासणी करून त्यांना योग्य तो औषधोपचार डॉ.इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला.

## बीडच्या आदित्य फार्मसी कॉलेजचा 'नॅशनल' डंका ; ७ विद्यार्थी GPAT परीक्षेत यशस्वी



बीड । प्रतिनिधी

नॅशनल टेस्टिंग एजन्सीमार्फत (NTA) घेण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील GPAT 2026 (ग्रॅज्युएट फार्मसी प्टिट्यूड टेस्ट) परीक्षेत बीडच्या आदित्य फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या निकालाने जिल्ह्याच्या शैक्षणिक शिरपेचात मानाचा तुरा रोवला असून, संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. या कठीण परीक्षेत आदित्य फार्मसी कॉलेजच्या तब्बल सात विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे.यामध्ये येलदेपवाड व्यंकटरामन प्रकाश, संतोष दत्ताराव गवळी, संग्रामसिंह दशरथ भाटेकर, ज्ञानेश्वर विश्वम्भर विघ्ने, खुशी वीरेंद्र यादव, ओंकार उद्धवराव डाके, ओंकार मछिंद्र जगताप या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

या यशाबद्दल आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा आणि संचालक डॉ. आदित्य सारडा यांनी यशस्वी विद्यार्थांचे अभिनंदन केले. GPAT ही परीक्षा फार्मसी क्षेत्रातील उच्च शिक्षणासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते.या परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना देशातील 'नायपर' (छखझएठ) सारख्या नामांकित संस्थांमध्ये प्रवेशाची संधी मिळते. तसेच पदव्युत्तर शिक्षणासाठी शिष्यवृत्तीचा मार्गही मोकळा होतो.विद्यार्थ्यांची जिद्द आणि महाविद्यालयाने पुरवलेल्या आधुनिक शैक्षणिक सुविधांमुळेच हे यश शक्य झाले आहे. हे यश विद्यार्थ्यांच्या जिद्दीचे आणि शिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनाचे फलित आहे. आमचे महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच तत्पर असते. विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रमाचे आज खऱ्या अर्थाने चीज झाले असे आदित्य फार्मसी कॉलेज चे प्रचार्य डॉ. दीपक पवार यावेळी म्हणाले. तर आदित्य फार्मसी कॉलेज प्राचार्य डॉ. कुमार सुरवसे म्हणले की, GPAT सारखी स्पर्धात्मक परीक्षा उत्तीर्ण होणे म्हणजे विद्यार्थ्यांची गुणवत्ता राष्ट्रीय स्तरावर सिद्ध होणे होय. यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला असून शैक्षणिक दर्जा सुधारण्यास मदत झाली आहे.विद्यार्थ्यांच्या यशामुळे महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा अधिक उंचावला आहे. त्यांनी भविष्यातही अशीच उत्तुंग कामगिरी करत राहावी. या यशाने संस्थेतील इतर विद्यार्थांनाही प्रेरणा मिळत आहे.

–डॉ. आदित्य सारडा, संचालक आदित्य शिक्षण संस्था, बीड.

## पान ६ वरून...

पान ६ वरून...

### उद्योजक राहुल लोखंडे

त्यांच्या अचानक झालेल्या निधनाने व्यावसायिक व सामाजिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे. त्यांच्या आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.

दरम्यान, त्यांचा अंत्यविधी त्यांच्या मूळ गावी उखांडा (ता. पाटोदा, जि. बीड) येथे करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. सर्वांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. राहुल लोखंडे यांच्या निधनामुळे एक होतकरू व यशस्वी तरुण उद्योजक काळाच्या पडद्याआड गेला असून त्यांच्या जाण्याने मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

### सिरसदेवी येथे एलसीबीचा

करण्यात आला आहे.

**यांनी केली कारवाई :** ही धाडसी कारवाई बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोउपनि सुशांत सुतळे, आनंद मस्के, विकास राठोड, राहुल शिंदे, अंकुश वरपे, बबन सलगर, अतुल हराळे तसेच तलवडा पोलीस ठाण्याचे सपोनि जंजाळ, पोउपनि अन्नलदास आणि इतर कर्मचाऱ्यांचा समावेश होता.

### आष्टीत एसीबीचा

कारवाई व्हावी, अशी ठाम मागणी शिवसंग्रामचे तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर चौधरी यांनी केले: लाचखोरीला शून्य सहनशीलता

कोणताही शासकीय अधिकारी लाच मागत असल्यास नागरिकांनी तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कडे तक्रार करावी. तक्रारदाराची ओळख गोपनीय ठेवली जाते आणि दोषींवर कठोर कारवाई केली जाते, असे एसीबीकडून स्पष्ट करण्यात आले आहेभीतीचा भंग, कारवाईचा संदेश आष्टीतील ही कारवाई केवळ एक प्रकरण नसून संपूर्ण प्रशासनासाठी इशारा आहे. एसीबीच्या धडक मोहिमेमुळे भ्रष्ट अधिकाऱ्यांमध्ये भीती निर्माण झाली असून, 'लाचखोरीला आता माफी नाही' असा स्पष्ट संदेश दिला गेला आहे.

### ढेकनमोहा येथे रक्तदान

भैय्या हरणावळ, विकास ढवळे, पोपट शिंदे ,बापू शिंदे, भीमा जाधव, विश्वजीत शिंदे, प्रकाश शिंदे, अप्पाराव मिसळे, अरविंद शिंदे, दत्ता शिंदे, दयाराज शिंदे, कृष्णा ससाने, बाबासाहेब शिंदे, महादेव शिंदे, भगवान शिंदे, कचराआप्पा शिंदे, रामेश्वर शिंदे, चंद्रकांत शिंदे, गोरख चौरे, गौरव गोंडे, ज्ञानेश्वर देवकते, सोनू शिंदे, उषा देवकते, नंदाबाई खांडे, सुमन शिंदे, कमल शिंदे, शुभांगी शिंदे, संगीता शिंदे, सोनाली शिंदे, आम्रपाली शिंदे, शितल शिंदे, निर्मला शिंदे, बबीता शिंदे आदी यावेळी उपस्थित होते

या उपक्रमाचे आयोजन मातोश्री रमाबाई आंबेडकर सेवाभावी संस्थेच्या वतीने करण्यात आले होते. सकाळी लवकरच शिबिरास सुरुवात झाली असून, परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. रक्तदान शिबिरात युवकांनी विशेष पुढाकार घेतला आणि अनेकांनी प्रथमच रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. आरोग्य शिबिरामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमकडून नागरिकांची सर्वसाधारण तपासणी करण्यात आली. यामध्ये रक्तदाब, मधुमेह तपासणी, तसेच विविध आजारांवरील सल्ला देण्यात आला. नेत्र तपासणी शिबिरात डोळ्यांची तपासणी करण्यात आले. तसेच नागेश शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबविण्याची परंपरा कौतुकास्पद असल्याचे मत व्यक्त केले. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी मित्रपरिवार, डॉक्टर व ग्रामस्थांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद शिंदे यांनी केले आणि भविष्यातही असे सामाजिक उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी मोठ्या संख्येने मित्रपरिवार, गावातील ग्रामस्थ यांची उपस्थिती होती.

### बांधकाम परवाना मागणाऱ्या

फोन करून बोलावून घेतले. त्यानंतर त्यांना उपचारासाठी बार्दापूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले, तिथून त्यांना पुढील उपचारासाठी अंबाजोगाई येथील स्वा. रा. ती. रुग्णालयात पाठवण्यात आले. उपचार घेतल्यानंतर दि. १६ एप्रिल रोजी गाडवे यांनी बार्दापूर पोलीस ठाण्यात धाव घेऊन सरपंच भगवान रावसाहेब हारे यांच्याविरुद्ध भा.न्या. सं. कलम ११५(२), ३५२, ३५२(२) नुसार तक्रार दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणी पोलीस पुढील तपास करत आहेत.

### अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरण

तसेच उपवर्गीकरणाचा आधार व पद्धत स्पष्ट करावी, अशी मागणी करण्यात आली. निवेदन मंडळ अधिकारी उज्ज्वला राऊत, सहाय्यक फौजदार विठ्ठल राठोड, पोलिस जमादार अविनाश घुंगरट यांच्या मार्फत जिल्हाधिकारी , पोलिस अधीक्षक,मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना देण्यात आले.

### सावरगावची वाळू खरडून

शेतकऱ्यांच्या शेतातून आपली वाहने नेऊन या ठिकाणी अवैध वाळू उपसा सर्रास चालू आहे. या सर्व वाळू उपशाला स्थानिक नेत्याचा आशीर्वाद तर आहेच. याशिवाय स्थानिक पोलिस आणि महसूल कर्मचाऱ्यांचाही आशीर्वाद आहे. या जोरावरच सावळेश्वर येथून मोठ्या प्रमाणात वाळू उपसा केला जात आहे. आता या वाळू उपसाच्या प्रकरणांमध्ये जिल्हाधिकारी – पोलीस अधीक्षक यांनीच लक्ष घालणे गरजेचे आहे. या अवैध वाळू उपशामुळे ज्यांच्या शेतातून सर्रास वाहने नेली जातात त्या सावरगाव , सावळेश्वर व खामगाव येथील शेतकरी त्रस्त झाले असून त्यांनी मज्जाव केला तर त्यांना धमक्या दिल्या जातात. या शेतकऱ्यांनी तक्रार कोणाकडे करायची असा मोठा प्रश्न आहे. सर्वांचीच मिलीभगत असेल तर शेतकरी तक्रार तरी कोणाकडे करणार? त्यामुळे आता या प्रकरणात जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षकांनी स्वतः लक्ष घालून हा प्रकार बंद करावा अशी मागणी परिसरातील नागरिक करत आहेत.

## संस्कार भारतीची संगीत सभा उत्साहात संपन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

**संस्कार भारतीच्या वतीने आयोजित 'संगीत सभा' हा सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि रसिकांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाचे आयोजन श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिर, जिजामाता उद्यान, मंगलनाथ कॉलनी येथे करण्यात आले होते.**

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती माता पूजन व संस्कार भारतीच्या ध्येय गीताने करण्यात आली. या संगीत सभेत कु.श्रेया ठोंगे (संगीत विशारद) यांनी आपल्या सुरेल व भावपूर्ण आवाजात विविध रचना सादर करून उपस्थितांची मने जिंकली. सुरुवातीला राग मारू बिहाग मधील एका बंदिशीने झाली. त्यानंतर तुज मागतो मी आता,



अवचिता परिमळू, वृंदावणी वेणू, काटा रुते कुणाला, उमलले आभाळ भर हे या भावगीत व भक्तिगीतांच्या सादरीकरणाने वातावरण भारावून गेले.

त्यांच्या गायनाला रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली. साथसंगत म्हणून कुणाल कुलकर्णी यांनी संवादिनीची साथ देत कार्यक्रमाची शोभा वाढवली, तर तबल्यावर गणेश विभुते यांनी तालबद्ध साथ देत सादरीकरण अधिक रंगतदार केले. यावेळी स्व. आशा भोसले यांना आदरांजली अर्पण करत धुंदी कळ्यांना, फुलले रे क्षण, सलोना सा सजन, केंव्हा तरी पहाटे, रामा रघुनंदना या अजरामर गीतांचेही सुंदर सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून प्रा.स्नेहल पाठक (अध्यक्ष, संस्कार भारती, देवगिरी प्रांत), मंगलनाथ कॉलनीतील प्रतिष्ठित गोविंद बजाज, कॉलनीचे अध्यक्ष लक्ष्मीकांत काळे तसेच मंगलनाथ कॉलनीतील प्रत्येक नागरिक यांची उपस्थिती लाभली. त्यांनी कलाकारांचे कौतुक करत अशा सांस्कृतिक उपक्रमांमुळे भारतीय संस्कृतीचे जतन व संवर्धन होत असल्याचे प्रतिपादन केले.

मंगलनाथ कॉलनीतील व परिसरातील संगीतप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा मनमुराद आनंद घेतला. कार्यक्रमाचे आयोजन संस्कार भारती संयोजन समिती व विठ्ठल–रुक्मिणी मंदिर, मंगलनाथ कॉलनी यांच्या वतीने करण्यात आले होते. या कार्यक्रमावेळी सुरेश देशपांडे व नंदिनी गर्गे यांनी अतिशय उत्कृष्ट असे आशाताई भोसले यांचे पोर्ट्रेट रांगोळीने काढले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहिणी माळेवाडीकर यांनी केले तर आभार संजय कुलकर्णी यांनी मानले. एकूणच, सुरेल गायन, उत्तम साथसंगत आणि रसिकांच्या दादेमुळे ही संगीत सभा सांस्कृतिक वातावरणात रंगून यशस्वीरीत्या पार पडली.संगीत सभा यशस्वी करण्यासाठी सुबोध देशपांडे, गणेश विभुते, सुरेश देशपांडे, नंदिनी गर्गे, कुणाल कुलकर्णी, संजय कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले.

## वंदना सोनवणे प्रथम

बीड । प्रतिनिधी

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त कल्याण येथील सुभाष टेकडी लाल चौक येथे घेण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये संगीत खुर्चीत प्रथम क्रमांक पटवलेल्या वंदना सोनवणे यांना ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला.



सुभाष टेकडी लाल चौक परिसरात भारतरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात संगीत खुर्ची, रस्सीखेच, वकृत्व स्पर्धा, गायन स्पर्धा आदी स्पर्धेचा आयोजन करण्यात आले होते. यामध्ये संगीत खुर्ची क्रीडा प्रकारात वंदना सोनवणे हिने प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या यशाबद्दल आयोजकाच्या वतीने ट्रॉफी देऊन तिचा सन्मान करण्यात आला. या यशाबद्दल त्यांच्या कुटुंबाने व मित्रपरिवाने त्यांना शुभेच्छा दिल्या व अभिनंदन केले. या वेळी संपादक उत्तम ओव्हाळ, बालासाहेब पणघुले, गोरख काळे, आकाश मस्के, नम्रता सोनवणे, यश कल्याण सोनवणे, गौतम ओव्हाळ, रितेश ओव्हाळ, बाबासाहेब खेमाडे व मित्र परीवार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जय जवान विद्यालयात जागर संविधानाचा अभियान, पुरस्कार वितरण व बाळ मेळावा उत्साहात

वडवणी । प्रतिनिधी

अरुणा असफ अली महिला मंडळ बीड संचलित, संस्थेचे जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव तालुका वडवणी जिल्हा बीड या विद्यालयात *शैक्षणिक सत्र २०२५ २६ लोकपंचायत जागर संविधानाचा अभियान अंतर्गत संविधान ज्ञान परीक्षा २०२६ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या परीक्षेच्या पुरस्कार वितरण कार्यक्रम सोहळा व बाल आनंद नगरी २०२६ कार्यक्रम संपन्न झाला.

दिनांक २१ एप्रिल २०२६ वार मंगळवार रोजी सकाळी ठीक ०९:०० वाजता. जय जवान माध्यमिक विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव. तालुका वडवणी जिल्हा बीड. या ठिकाणी उत्साहात संपन्न झाला. दिनांक ०६ एप्रिल २०२६ रोजी संविधान ज्ञान परीक्षेमध्ये सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थी (इयत्ता सहावी ते इयत्ता नववी गटातील ) यांना स्मृतीचिन्ह, संविधान उद्देशिका, रोख रक्कम व सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम सोहळा पार पडला सदरील कार्यक्रमास सर्वप्रथम उपस्थित आमचे मार्गदर्शक,आधारस्तंभ, संस्थेच्या अध्यक्ष आदरणीय प्रा.शुशिलाताई मोराळे मॅडम, मा.श्री.बशीर इमाम शेख सरपंच,श्री. दत्ता शेजाळ, शा.व्या.अध्यक्ष,श्री.रावसाहेब राऊत सामाजिक कार्यकर्ते, श्री.पठाण सर मुख्याध्यापक जी प शाळा मराठी कवडगाव,श्री. राजू सर मुख्याध्यापक, जी प प्रा उर्दू शाळा कवडगाव, विद्यालयाचे प्राचार्य श्री सारोक्ते डी जी, उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते सर्व महापुरुषाच्या



पावन प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. त्याच बरोबर उपस्थित सर्व मान्यवर व्यक्ती कार्यक्रम अध्यक्ष, प्रमुख पाहुणे मान्यवर यांचे स्वागत करत आदर सत्कार करण्यात आला.

संस्थेच्या मा.अध्यक्षा आदरणीय प्रा.शुशिलाताई मोराळे मॅडम यांनी सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी व सर्व उपस्थितांना अनमोल असे मार्गदर्शन केले.त्यामध्ये त्यांनी भारतीय संविधान आणि आजची परिस्थिती,संविधानाचे महत्त्व तसेच संविधानिक मूल्य जोपासणे,संविधान निर्मितीचा इतिहास,तसेच मार्गदर्शक तत्व नुसार आचरण व पालन करणे आवश्यक असल्याचे सांगितले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान हा ग्रंथ सबंध लोकांना अर्पण केला व जसे आपले काही हक्क, अधिकार आहेत तसेच त्याबाबत आपले काही जबाबदारी सुद्धा आहेत हे ही आपण विसरता कामा नये.असे हे संविधान जागर चळवळीतून सर्वांना संविधान वाचन करून संविधान घराघरात असणे महत्त्वाचे आहे.त्याच बरोबर शालेय विद्यार्थ्यांना अनमोल असे मार्गदर्शन केले.तसेच गुणवंत विद्यार्थी व विद्यार्थिनी यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.नंतर बाल आनंद नगरी चे उद्घाटन उपस्थित सर्व मान्यवर व्यक्ती यांच्या हस्ते करण्यात आले.व आनंद नगरी कार्यक्रमास उपस्थित सर्व मान्यवर व्यक्ती, गावातील सर्व ग्रामस्थ, ज्येष्ठ नागरिक, शिक्षण प्रेमी, पालक वर्ग, माजी विद्यार्थी संघ,विद्यार्थी विद्यार्थिनी, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, जी प प्रा मराठी, उर्दू शाळा सर्व शिक्षक, विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी आस्वाद घेतला. कार्यक्रमाचे सूत्र संचालन चोपडे सर सांस्कृतिक विभाग प्रमुख यांनी केले.शेवटी कार्यक्रमास उपस्थित सर्व मान्यवर व्यक्ती व सर्व गावकरी पालक वृंद जी प प्रा शाळा मराठी, उर्दू कवडगाव,माजी विद्यार्थी संघ यांचे आभार व्यक्त करत कार्यक्रमाची सांगता झाली.

# म्हशींमधील स्फुरदच्या कमतरतेमुळे, उन्हाळयात उद्भवतो हा आजार

शेतकरी मित्रांन बऱ्याचदा उन्हाळयात जनावरांना लालसर रंगाची लघवी होते. या आजाराला 'लाल मूत्र रोग' असे म्हणतात. हा रोग म्हशींमध्ये स्फुरदच्या कमतरतेमुळे होतो. या आजाराचा प्रादुर्भाव जास्त दुधाचे उत्पादन देणाऱ्या म्हशी आणि शेवटच्या टप्प्यातील गाभण म्हशींमध्ये दिसून येतो. या आजारामुळे दुधाळ जनावरांच्या दूध उत्पादनात घट दिसून येते. औषध उपचारासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. वेळेत उपचार न केल्यास म्हशींना रक्तक्षयासारखा आजार होऊ शकतो. त्यामुळे या आजाराकडे वेळीच लक्ष देणे आवश्यक आहे. या आजाराची बाधा साधारणपणे ५ ते १० वर्षे वयोगटातील म्हशींमध्ये तिसऱ्या ते सातव्या वेतामध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येते.

काय आहेत रोग होण्यामागची कारणे : आहारातील स्फुरदची कमतरता हे या आजाराचे प्रमुख कारण आहे.

दूध उत्पादनासाठी तसेच गर्भातील वासराची वाढ योग्य प्रकारे होण्यासाठी स्फुरदची गरज असते. महाराष्ट्रातील जमिनीत स्फुरदचे प्रमाण कमी किंवा अगदी नगण्य आहे. जनावरांना खाद्यासाठी दिला जाणारा चारा हा याच मातीत उगवलेला असल्याने पिकात स्फुरदची कमतरता निर्माण होते. परिणामी म्हशी लाल मुत्र आजारास बळी पडतात. त्यातही वाळलेल्या चाऱ्यामध्ये स्फुरदचे प्रमाण अगदी नगण्य असते.



या आजाराची लक्षणे : या आजाराचे प्रमुख लक्षण म्हणजे लाल, काळसर किंवा कॉफीच्या रंगाची लघवी होते. म्हैस शेण टाकताना कुंथुन बाहेर टाकतात. खाणेपिणे मंदावते, वजन घटते, अशक्तपणा वाढून जनावर मलूल बनते. दूध उत्पादन घटते. शरीराचे तापमान जरी सर्वसाधारण असले तरीही नाडीचा आणि श्वसनाचा वेग वाढतो. तीव्र स्वरूपाचा रक्तक्षय होतो. डोळ्यातील श्लेम पटल पांढरे किंवा कावीळ झाल्यास पिवळसर पडतात. बाधित म्हशींचा उपचार केला नाही तर तीव्र स्वरूपाचा रक्तक्षय होवून ४-५ दिवसात बाधित म्हशी दगावण्याची शक्यता असते.

कसे करा निदान : हा आजार प्रामुख्याने नवीन विलेल्या म्हशींमध्ये शेवटच्या दोन महिन्यामध्ये जास्त प्रमाणात दिसून येतो. तसेच गाभन जनावरांमध्ये शेवटच्या तीन महिन्यामध्ये या आजाराची बाधा दिऊन येते. या आजाराची बाधा डिसेंबर ते जुले च्या दरम्यान आढळून येते. स्फुरद खनिजचे इंजेक्शन ३ ते ५ दिवस दिल्यास बाधित म्हशी उपचारास चांगला प्रतिसाद देतात. रक्तामधील स्फुरदचे प्रमाण ४-६ ग्रॅम प्रति १०० मिली रक्त किंवा त्यापेक्षा कमी झाल्यास प्रयोगशालेत तपासणी करून घ्यावी.

औषधोपचार : या आजाराचे तत्काळ निदान करून पशुवैद्यकांकडून उपचार करून घेतल्यास बाधित म्हशींना वाचवता येते. यामध्ये प्रामुख्याने स्फुरद खनिजयुक्त इंजेक्शन, सलाईन, ब जीवनसत्व इंजेक्शन, रक्त वाढविण्यासाठी टॉनिक वापरल्यास म्हशी उपचारास प्रतिसाद देऊन आजारातून बऱ्या होतात. परंतु उपचार सुरु करण्यास विलंब झाल्यास उपचारांती बाधित म्हशींमध्ये तीव्र स्वरूपाचा रक्तक्षय आणि कावीळ होवून मरतुक होऊ शकते. जर बाधित म्हशींमध्ये हिमोग्लोबिन ५ ग्रॅम/लिटर पेक्षा कमी झाल्यास अशा म्हशींमध्ये निरोगी दाता म्हशीचे किमान १.५ ते २ लिटर रक्त चढविण्यात यावे.

प्रतिबंध : चांगली दुग्ध उत्पादकता असलेल्या म्हशींच्या आहारातील स्फुरद खनिजाचे व्यवस्थित नियोजन केल्यास लाल मुत्र या आजाराला आळा घालता येवू शकतो. गाभण व दुभत्या म्हशींच्या आहाराचे योग्य व्यवस्थापन करून पुरेशा प्रमाणात स्फुरद आहारात उपलब्ध करून दिल्यास गर्भात वाढणाऱ्या वासराच्या किंवा दूध निर्मितीसाठी लागणाऱ्या स्फुरद खनिजाची गरज भरून निघेल आणि अशा म्हशी या आजारास बळी पडणार नाहीत. म्हशींना आहारात वळलेला चारा, हिरवा चारा व खुराक योग्य प्रमाणात दिल्यास तसेच नियमित ५० ग्रॅम खनिज मिश्रणाचा पुरवठा केल्यास हा आजार पूर्णपणे टाळता येतो. आहारात कॅल्शियम आणि स्फुरद यांचे प्रमाण २:१ राहील याचीही काळजी घ्यावी.

## मोगरा फुलशेती करा; मिळेल भरघोस नफा

गेल्या काही दिवसांपासून राज्यात फुल शेतीला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. यातही शेतकरी शेवंती, गुलाब, झेंडू या फुलांकडे अधिक प्रमाणात वळत आहे. काही प्रमाणात मोगऱ्याच्या फुलांची देखील शेतकरी लागवड करत आहे. मात्र, इतर फुलांपेक्षा मोगरा लागवडीचे प्रमाण कमी आहे. मोगऱ्याचे फुल हे दररोज देव पूजेसाठी, सणसमारंभांसाठी तसेच सौंदर्य प्रसाधने उद्योग, केसांचे तेल यामध्ये वापरले जाते. ज्यामुळे मोगऱ्याच्या फुलांना मोठी मागणी असते.

कधी होते लागवड?

शेती तज्ज्ञांनी मोगऱ्याच्या शेतीला व्यावसायिक शेती पीक मानले आहे. मोगऱ्याचे झाड १० ते १५ फूट उंचीपर्यंत वाढते. त्याची सदाहरित पाने दोन ते तीन इंच लांब आणि देठ पातळ असते. मोगऱ्याची फुले पांढरी असून, ती अतिशय सुंदर आणि सुवासिक असते. मोगऱ्याच्या झाडाला मार्च ते जून महिन्यात फुले येतात. मोगऱ्याच्या फुलाचा वापर विशेषत: हार, सजावट आणि देवाच्या पूजेमध्ये केला जातो. मोगऱ्याची लागवड जून ते नोव्हेंबर या कालावधीदरम्यान केव्हाही केली जाऊ शकते.

किती मिळतो दर?

मोगऱ्याच्या फुलांना २५० रुपये प्रति किलोचा भाव सहज मिळतो. तर लग्न किंवा सण-समारंभाच्या काळात ही ४०० रुपये प्रति किलोपर्यंत विकली जातात. मोगऱ्याच्या फुलांचा उपयोग परफ्यूम, साबण, क्रीम, तेल, शॅम्पू आणि डिटर्जंट पावडरमध्ये सुगंधासाठी केला जातो. भारतात याची लागवड



प्रामुख्याने पंजाब, आंध्र प्रदेश, तामिळनाडू आणि हरियाणामध्ये केली जाते.

कसे लागते हवामान?

मोगऱ्याच्या लागवडीसाठी उष्ण व दमट हवामान उत्तम मानले जाते. त्याचवेळी, त्याच्या काही जाती अगदी थंड हवामानात देखील सहजपणे वाढू शकतात. रोपाच्या वाढीसाठी सर्वात योग्य तापमान २४ अंश सेल्सिअस ते ३२ अंश सेल्सिअस तापमान आवश्यक असते. हिमाचल प्रदेश, हरियाणा, बिहार, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात या राज्यांमध्ये नवीन वाणांपासून चांगली कमाई करता येते.

नियमित पाणी देणे आवश्यक

मोगऱ्याच्या झाडांना नियमित पाणी द्यावे लागते. उन्हाळी हंगामात आठवड्यातून किमान दोनदा पाणी द्यावे. मध्यम हवामानात आठवड्यातून एकदाच पाणी देणे पुरेसे असते. मोगऱ्याला हंगाम आणि जमिनीनुसार सिंचन आवश्यक असते.

मोगऱ्याचे रोप लावल्यानंतर नऊ ते दहा महिन्यांनी फुले येण्यास सुरुवात होते. तर काही जातींमध्ये वर्षभर झाडांना फुले येतात. बहुतेक प्रजातींमध्ये फुलांचा काळ हा मार्च ते ऑक्टोबर महिन्यापर्यंत असतो. सकाळी सूर्याची किरणे फुलांवर पडण्याआधी फुले तोडली तर उत्तम असते. त्यामुळे त्यांचा सुगंध टिकून राहण्यास मदत होते.

## रुफ टॉप वॉटर हार्वेस्टिंग प्रणाली व्यवस्थापन आणि देखभाल

शहरीकरण आणि त्यातील पूर ही काही नवीन संकल्पना नाही. महाराष्ट्रामध्ये सन २००५ मध्ये आलेला पूर, चेन्नई मध्ये २०१५, पुणे व बेंगलोर मध्ये २०१९ ला असे अनेक पुर मोठ्या शहरांमध्ये दिसून येत आहेत. याला कारणीभूत म्हणजे वाढत्या शहरीकरणाबरोबर त्यातील ड्रेनेजची असलेली असुविधा आणि अयोग्य पाणी व्यवस्थापन. पाऊस पडल्यानंतर पाण्याला वाहून जाण्यासाठी वाट योग्य नसेल तर ते रस्त्यावर येऊन साठायला लागतो. हळूहळू मग तो मोठ्या पुराचे रूप धारण करते. नाल्यामध्ये कचरा अडकला तर ते ब्लॉक होते आणि पाण्याला वाहण्यासाठी मार्ग मिळत नाही मग ते रस्त्यावर येऊन साठते. पावसाचे पाणी असो अथवा रोजच्या वापरातील पाणी असो त्याला एकाच ठिकाणी सोडले जाते ते म्हणजे गटर किंवा ड्रेनेज लाईन. गटारीच्या क्षमतेपेक्षा जास्त पाणी झाल्यानंतर नाला तोडून ते पाणी सपाटभू भागावर व रस्त्यावर येते आणि पसरते. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो, तसेच रस्ते खराब होतात. पुरामुळे नुसते रस्ते खराब होत नाही तर डेंग्यू चिकनगुनिया, थंडी ताप व मलेरिया या सारखे विविध साथीचे आजार सुद्धा पसरतात. ही अवस्था शहराकडील तर काही गावे पाण्यापासून वंचित आहेत पाण्याची असलेल्या कमतरतेमुळे दैनंदिन जीवनावर त्याचा परिणाम होऊ लागला आहे. याला पाण्याचे असलेले अव्यवस्थापन हे तितकेच कारणीभूत आहे. या सर्वांना आळा घालण्यासाठी एक लक्षवेधी उपाय म्हणजे रेन वॉटर हार्वेस्टिंग. या तंत्रज्ञानामुळे आपल्याला पावसाच्या पाण्याचे योग्य व्यवस्थापन करता येते. पावसाचे पाणी वेगवेगळ्या पद्धतीने मार्गाने साठवता येते. अशाच काही पद्धती खालील प्रमाणे,

छतावरील पाणी साठवणूक पद्धत : या मध्ये छतावर पडणाऱ्या पाण्याला एकत्र करून जमिनीमध्ये भूजल पुनर्भरणासाठी सोडता येते किंवा स्टोरेज टाकीमध्ये साठवून ते पुढील



काळासाठी वापरता येऊ शकते. पावसाचे पाणी पुनर्भरण किंवा पुनर्वापर खालील पद्धतीद्वारे करता येते. पावसाच्या पाण्याचे पुनर्भरणी करून भूजल पातळी वाढविण्यात येते तसेच वाहणाऱ्या पाण्याचे नियंत्रण सुद्धा करता येते. शहरी भागात इमारतीचे प्रमाण जास्त असते व छतांना पडणारे पावसाचे पाणी नियोजना अभावी मोठ्या प्रमाणात वाहून जाते त्यामुळे छतावरील पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे छतावरील पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजनाद्वारे खालील गोष्टी साध्य करता येतात. त्यामध्ये प्रामुख्याने, भूजलाचा स्थर नियंत्रित करता येते. शहरात येणाऱ्या पुराच्या पाण्याची तीव्रता व वारंवारिता कमी करण्यासाठी मदत होते. दुष्काळात पाण्याची उपलब्धता होण्यास मदत होते. भूजलातील पाण्याची पातळी व गुणवत्ता सुधारता येते. जल प्रदूषण रोखण्यास मदत होते. पाण्याची होत असलेली कमी पूर्ण करता येते. पावसाळ्यात गटार व नाले ब्लॉक होऊन पूर येऊ नये याकरिता.

संरचनेचे घटक : घराचे छत हे वेगवेगळ्या प्रकारचे असते. त्यामध्ये प्रामुख्याने जीआय, , सिमेंट पत्रे, कौलारू तसेच मातीचे छत इत्यादींचा समावेश असतो. छतासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्यानुसार छतावरील पाण्याची उपलब्धता कमी जास्त होते. छतावरील पावसाच्या पाण्याचे संकलन करण्याकरता छत बिनविषारी पदार्थापासून बनविलेले असावे. त्याला वॉटरप्रूफिंग केलेले असावे.गटार आणि प्रथम फ्लश डिव्हाइस :याचा वापर छतावरील पाणी साठवून खाली स्टोरेज टाकी पर्यंत खाली जाण्याचा पाईपने नेण्यासाठी करतात. ह्याला छता च्या काठावर सौम्य उतार देऊन बसवले जाते, जेणेकरून पाणी विना अडथळ्यांनी स्टोरेज टाकीपर्यंत जाईल. यासाठी - पाईप, किंवा बांबूचा वापर करतात. डाऊन पाईपचा व्यास कमीत कमी १०० मीमी आणि २० मेश ची जाळी असावी कारण झाडाची पाने किंवा लहान खड्डे आत जाऊन ब्लॉक होणार नाहीत. गटारची व्यास आणि रुंदी : १५ ७९७:२००८ च्या दिलेल्या निर्देशकावरून घ्यावा किंवा मानक सूत्रांवरून काढावा. हे उपक्रम हे सुनिश्चित करते की प्रथम पावसाचे आधी छतावर किंवा गटारीमध्ये कचरा किंवा धूळ जमा झाले असेल तर प्रथम पावसानंतर ते पावसाच्या पाण्यात मिसळून पाणी साठवून प्रणालीमध्ये जाऊ नये. म्हणून पहिले एक ते दोन पाऊस सर्व पाणी फ्लश करून हे डिवाइस बंद करतात जेणेकरून पुढील स्वच्छ पाणी साठवण टाकीमध्ये साठवता येते.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### जागतिक वसुंधरा दिन

### महत्वाच्या घटना

१०५६ : क्रॅब नेब्यूलामधील (तेजोमेघ) सुपरनोव्हाचा महास्फोट
१५०० : पोर्तुगाल नाविक पेड्रो अल्वेयेर कैब्राल यांनी ब्राझील देशाचा शोध लावला.
१९१५ : पहिल्या विश्वयुद्धा दरम्यान जर्मन सेनांनी पहिल्याचा विषारी वायूचा वापर केला.
१९२१ : नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी प्रशासकीय सेवेतून आपल्या पदाचा राजीनामा दिला.
१९४८ : अरब-इस्त्रायल युद्ध अरबांनी इस्त्रायलचे हैफा हे प्रमुख बंदर काबीज केले.
१९७० : पृथ्वी दिन पहिल्यांदा साजरा करण्यात आला.
१९७७ : टेलिफोन वाहतूक सुरू करण्यासाठी प्रथम ऑप्टिकल फाइबरचा वापर केला गेला.
१९७९ : आचार्य विनोबा भावे यांनी संपूर्ण गोहत्या बंदीच्या मागणीसाठी उपोषण सुरु केले.
१९९७ : राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेचे संचालक डॉ. कल्याण बॅनर्जी यांना विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील 'ओमप्रकाश भसीन पुरस्कार' जाहीर
२००६ : प्रवीण महाजन यांनी भाजपचे नेते प्रमोद महाजन यांच्यावर कौटुंबिक वादातुन गोळ्या झाडल्या.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६९८ : वैशाख व. ७, शके १६२० शिवदिननाथ नाथपरंपरेतील एका शाखेचे प्रमुख सत्पुरुष (मृत्यू: )
१७२४ : एमॅन्युएल कांट जर्मन तत्त्ववेत्ता (मृत्यू: १२ फेब्रुवारी १८०४)
१७६० : मुघल शासक शाहाआलम यांचे द्वितीय पुत्र व भारतातील शेवटचे मुघल शासक बहादूर शहा द्वितीय यांचा जन्मदिन.
१८१२ : लॉर्ड जेम्स अ‍ॅन्ड्र्यू ब्राउन रॅमसे डलहौसी भारताचा गव्हर्नर जनरल (१८४८-१८५६), त्यांनी सार्वजनिक बांधकाम खाते स्थापन करुन सुमारे ३,४०० किमी लांबीचे रस्ते केले. टपाल व तार यांची सेवा सुरू केली. मुंबई ते ठाणे हा लोहमार्ग त्यांच्याच कारकीर्दीत सुरू झाला. (मृत्यू: १९ डिसेंबर १८६०)
१८७० : व्लादिमीर लेनिन रशियन क्रांतिकारक (मृत्यू: २१ जानेवारी १९२४)
१९०४ : जे. रॉबर्ट ओपेनहायमर अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ, अणूबॉम्बचे जनक (मृत्यू: १८ फेब्रुवारी १९६७)
१९१४ : भारतीय दिग्दर्शक आणि निर्माता बलदेव राज चोपडा यांचा जन्म. (मृत्यू: ५ नोव्हेंबर २००८)
१९१६ : यहुदी मेन्युहीन व्हायोलिनवादक व वाद्यवृंदसंचालक (मृत्यू: १२ मार्च १९९९)
१९१६ : काननदेवी अभिनेत्री व गायिका (मृत्यू: १७ जुलै १९९२)
१९२९ : प्रा. अशोक केळकर विख्यात भाषाशास्त्रज्ञ व साहित्य समीक्षक
१९२९ : उषा मराठे खेर ऊर्फ 'उषा किरण' शंभराहून अधिक चित्रपटात व रंगभूमीवर अभिनेत्री, मुंबईच्या नगरपाल (मृत्यू: ९ मार्च २००० नाशिक)
१९३५ : भारतीय-अमेरिकन गणितज्ञ आणि शैक्षणिक भामा श्रीनिवासन यांचा जन्म.
१९४५ : भारतीय प्रशासकीय अधिकारी आणि राजकारणी गोपाळकृष्ण गांधी यांचा जन्म.
१९७४ : प्रख्यात इंग्रजी कादंबरीकार व लेखक चेतन भगत यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१६ : भारतीय पंजाबी भाषेचे नाटककार, नाट्य दिग्दर्शक, कादंबरीकार आणि लघुकथा लेखक व शिक्षणतज्ञ बलवंत गार्गी यांचे निधन.
१९३३ : रोल्स-रॉयस लिमिटेड चे सहसंस्थापक हेन्री रॉयस यांचे निधन. (जन्म: २७ मार्च १८६३)
१९८० : फ्रिट्झ स्ट्रासमान जर्मन भौतिकशात्रज्ञ (जन्म: २२ फेब्रुवारी १९०२)
१९९४ : आचार्य सुशीलमुनी महाराज थोर विचारवंत, द्रष्टे समाजसुधारक आणि पुरोगामी सेवाव्रती जैन आचार्य (जन्म:)
१९९४ : रिचर्ड निक्सन अमेरिकेचे ३७ वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: ९ जानेवारी १९१३)
२००३ : बळवंत गार्गी पंजाबी नाटककार, दिग्दर्शक, कादंबरीकार व लघुकथाकार, पंजाब विद्यापीठातील भारतीय रंगभूमी विभागाचे प्रमुख, 'थिएटर ऑफ इंडिया' आणि 'फोक थिएटर ऑफ इंडिया' या पुस्तकांचे लेखक (जन्म: ४ डिसेंबर १९१६ भटिंडा, पंजाब)
२०१३ : लालगुडी जयरामन व्हायोलिनवादक, संगीतकार व गायक (जन्म: १७ सप्टेंबर १९३०)
२०१३ : जगदीश शरण वर्मा भारताचे २७ वे सरन्यायाधीश (जन्म: १८ जानेवारी १९३३)

# तिप्पट उत्पन्न देणाऱ्या जपानी रेड डायमंड पेरुची 'अशी' करा शेती


रेड डायमंड पेरु शेतकऱ्यांमध्ये खूप लोकप्रिय आहे. या पेरुचा दर खूप जास्त असून, बाजारात १०० ते १५० रुपये किलोने विकला जातो. हा पेरु त्याच्यातील चव आणि गोडवा यासाठी खूप लोकप्रिय आहे. या पेरुची लागवड करून शेतकरी काही वर्षांत श्रीमंत होऊ शकतात.

भारतातील बहुतेक शेतकरी पारंपारिक शेतीऐवजी अपारंपारिक पिकांची लागवड करत आहेत. या प्रयत्नात ते यशस्वी होत आहेत आणि चांगली कमाई करत आहेत. बहुतांश शेतकरी विविध प्रकारच्या फळांची लागवड करतात. देशातील अनेक राज्यांमध्ये शेतकऱ्यांनी जनापी डायमंड या जातीच्या पेरुची लागवड करण्यास सुरुवात केली असून त्यातून त्यांना चांगले उत्पन्न मिळत आहे.

योग्य हवामान आणि माती : रेड डायमंड पेरुच्या लागवडीसाठी १० अंश ते ४२ अंश सेल्सिअस तापमान योग्य मानले जाते. परंतु तापमान थोडे कमी झाले तरी त्याचा उत्पादनावर परिणाम होत नाही. या जातीच्या पेरुच्या लागवडीसाठी काळी किंवा वालुकामय चिकणमाती चांगली मानली जाते, तसेच जमिनीचा (सामू) ७ ते ८ असावी.रोप लागवड आणि रोपातील अंतर : जपानी रेड डायमंड पेरुची रोपे लावताना तुम्हाला त्यांच्यामधील जागेची विशेष काळजी घ्यावी लागेल. एका ओळीपासून दुसऱ्या ओळीपर्यंतचे अंतर सुमारे ८ फूट ठेवावे आणि रोपापासून रोपापर्यंतचे अंतर ६ फूट ठेवावे. चांगल्या वाढीसाठी शेतकर्यांना वर्षातून दोनदा रोपांची छाटणी करावी लागते. जेव्हा त्याचे फळ चिकूच्या आकाराचे होते तेव्हा आपण ते फळ पिशवी किंवा वर्तमानपत्राने झाकून ठेवावे. असे केल्याने पेरू पिकण्याची प्रक्रिया सुधारते आणि फळांवर डाग दिसत नाहीत.

खत आणि सिंचन : रेड डायमंड पेरुची लागवड करण्यासाठी शेतकऱ्यांनी शेणखत आणि गांडूळखत यांचा पिकांमध्ये वापर करावा. याशिवाय, एनपीके सल्फर, मॅग्नेशियम सल्फेट, कॅल्शियम नायट्रेट आणि बोरॉन यासारखी रासायनिक खते वापरू शकता. रेड डायमंड पेरुच्या झाडांना पाणी देण्यासाठी शेतकरी ठिबक सिंचन पद्धतीचा वापर करतात. याशिवाय वेळोवेळी सामान्य सिंचन देखील आवश्यक आहे.

रेड डायमंड पेरू पासून होणारी कमाई : जपानी रेड डायमंड पेरू सामान्य पेरुसारखा दिसतो. पण आतून तो टरबूजासारखा लाल असतो आणि बाहेरून तो नाशपातीसारखा गोड असतो. बाजारपेठेत स्थानिक पेरुचा भाव ५० ते ६० रुपये प्रति किलो तर जपानी रेड डायमंड पेरू १०० ते १५० रुपये किलो दराने विकला जातो. या पेरुची लागवड करून शेतकरी सामान्य पेरूपेक्षा ३ पट अधिक उत्पन्न मिळवू शकतात. या जातीच्या पेरुची लागवड करण्यासाठी खर्च सुद्धा कमी येतो.





राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# महिलांना समान संधी समान हक्क देणारे महात्मा बसवेश्वर हे महिला आरक्षणाचे खरे प्रेरणास्रोत-आ.मोनिका राजळे

**पाथर्डी । प्रतिनिधी**

बाराव्या शतकात म्हणजेच अशा कालखंडात की ज्या वेळी स्त्री चूल आणि मुल या संकल्पनेच्या बाहेर जाऊ दिले जात नव्हते अशा कालखंडात महात्मा बसवेश्वर महाराजांनी स्त्रियांना धार्मिक कार्यासह राज्यकारभारात आरक्षण दिले संसदेमध्ये नारी शक्ती बिल संमत होऊ दिले गेले नाही वस्तुतः हे बिल संमत झाले असते तर महात्मा बसवेश्वरांना हीच खरी मानवंदना ठरली असती असे प्रतिपादन आ.मोनिका राजळे यांनी केले पाथर्डी शहरातील वसंतराव नाईक ते उपजिल्हा रुग्णालय मार्गाला महात्मा बसवेश्वर चौक असे नामकरण आ.मोनिका राजळे नगराध्यक्ष अभय आव्हाड उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे सीईओ संतोष लांडगे नायब तहसीलदार रवींद्र शेकटकर यांचे हस्ते करण्यात आले त्यानंतर नगरपरिषद प्रशासनाचे वतीने महात्मा बसवेश्वर यांना मानवंदना देण्यात आली यावेळी बोलताना आ.मोनिका राजळे यांनी सांगितले की बाराव्या शतकात वर्ण



वंश उच्च निच भेदभाव व स्त्री पुरुष असमानता पराकोटीला पोहोचली असताना प्रवाहाच्या विरोधात जाऊन समानतेचे राज्य प्रस्थापित करणारे महात्मा बसवेश्वर महाराज यांचे कार्य आज खऱ्या अर्थाने आदर्शवत ठरत आहे असे सांगितले लिंगायत संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष संतोष जिरेसाळ यांनी प्रास्ताविकात महात्मा बसवेश्वर यांच्या कार्याला उजाळा दिला याप्रसंगी ज्येष्ठ नगरसेवक नंदकुमार शेळके सुभाष बोरुडे अमोल गर्जे ॲड प्रतिक खेडकर बंडू बोरुडे प्रतिक नागरे जगदीश मुने संजय देशमुख मनिषा उदमले संदीप पवार अजिनाथ मोरे पुरुषोत्तम इजारे रेणुका फुलशेटे अभिजित गुजर दयानंद जिरेसाळ संजय पैठणकर दत्तात्रय टेंभुरकर गजानन तारापुरे सचिन फुटाणे प्रथमेश नाकील संतोष बुरसे,चंदनकर जगदीश नरे सचिन साखरे संतोष मेगुंडे संजय होनमुने शुभम इजारे तन्मय फुटाणे हुमायून आतार आदींसह समाजबांधव उपस्थित होते आभार पुरुषोत्तम इजारे यांनी मानले.

# लाचखोर कृषी सहाय्यक राजकुमार खिल्लारे पकडला

**घनसावंगी । प्रतिनिधी**

लाचखोर राजकुमार खिल्लारे वय-४८ वर्षे, व्यवसाय- नौकरी, सहायक कृषी अधिकारी, बोरगाव (खु). ता. घनसावंगी जि. जालना. रा. संजय खंदारे यांच्या घरी किरायाने, डिमार्ट रोड, स्वप्नजा गार्डन, चतुर्थी हॉटेलच्या पाठीमागे, नांदेड.खाजगी ज्ञानेश्वर उर्फ माउली राम पवार, गुन्हा घ.ता.वेळ व ठिकाण बोरगाव तांडा ता. घनसावंगी जि. जालनादि.२०/०४/२०२६ रोजी बोरगाव ते मासेगांवकडे जाणा-या कच्चा रस्त्यावर ता. घनसावंगी तक्रारदार यांनी त्यांचे शेतात फळबाग लागवडीसाठी फळबाग योजनेअंतर्गत शेतात आंब्याचे झाडे लावले असून सदर योजनेअंतर्गत शासनाकडुन मिळणा-या अनुदानाचे कुशलचे मस्टर ऑनलाईन करण्यासाठी बोरगाव (खु) गावचे सहायक कृषी अधिकारी श्री. खिल्लारे यांनी ५०००/-रुपयाची मागणी केली. परंतू शासकीय अनुदानासाठी कुशलचे मस्टर ऑनलाईन करण्यासाठी कोठेही पैसे द्यावे लागत नाही हे तक्रारदारास माहित असल्यामुळे सहायक कृषी अधिकारी श्री. खिल्लारे यांनी मागणी केलेले पैसे हे लाच असल्याची तक्रारदाराची खात्री झाल्याने व तक्रारदार यांची पैसे देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ०७/०४/२०२६ रोजी ला. प्र. वि. कार्यालय जालना येथे समक्ष हजर राहून लेखी तक्रार दिली होती. दिनाक ०८/०४/२०२६ रोजी आलोसे श्री. राजकुमार खिल्लारे यांची त्यांच्या घनसावंगी येथील किरायाच्या खोलीवर पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता आलोसे श्री. राजकुमार मोतीराम खिल्लारे यांनी फळबाग योजनेअंतर्गत अंब्याचे झाडांचे कुशलचे मस्टर ऑनलाईन करण्यासाठी ५०००/- रुपये स्वीकारण्याचे पंचासमक्ष कबुल केले. त्यावरुन दि.२०.०४.२०२६ रोजी बोरगाव ते मासेगांवकडे जाणा-या कच्चा रस्त्यावर पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडुन ५,०००/-रुपये लाचेची रक्कम स्वीकारली व खाजगीइ्ञाने शेती, रा. बोरगाव तांडा ता. घनसावंगी जि. जालना यांनी प्रोत्साहन दिले. त्यांना लाचलुचपत प्रतिंधक विभाग जालना च्या पोलीस निरीक्षक, श्रीमती कोमल शिंदे, यांनी व त्यांच्या पथकातील अंमलदार यांनी ताब्यात घेतले.

# मालेवाडी येथे साकारणार संत भगवानबाबा यांचे मंदिर

**पाथर्डी । प्रतिनिधी**

मालेवाडी गावात हनुमान मंदिराच्या समोर राष्ट्रसंत व ऐश्वर्यसंपन्न संत भगवानबाबा यांचे भव्य मंदिर साकार होणार आहे रविवारी सकाळी अक्षयतृतीया शुभ मुहूर्तावर भगवानगडाचे उत्तराधिकारी ह.भ.प.कृष्णा महाराज शास्त्री यांच्या हस्ते संत भगवानबाबांच्या मंदिराचे भूमिपूजन करण्यात आले यावेळी ग्रामपंचायत सदस्य शुभांगी किर्तने युवा नेते आजिनाथ किर्तने जबाजी किर्तने उत्तम जवरे लक्ष्मण खेडकर बुवासाहेब खेडकर विश्व हिंदू परिषदेचे प्रखंडसहमंत्री गणेश जवरे राम जवरे विठ्ठल खेडकर भास्कर खेडकर शिवाजी खेडकर विजय टाकसाळे तसेच गावातील ग्रामस्थ उपस्थित होते भगवानगडाचे महंत नामदेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली मालेवाडी गावात हेमाडपंथी दगडी बांधकामात संत भगवानबाबांचे भव्य मंदिर व बगीचा सुशोभीकरण होणार आहे यापूर्वी भगवानगडाचे महंत नामदेव महाराज शास्त्री यांनी २०१४ या वर्षी मालेवाडी गावात संत भगवानबाबांच्या मंदिराचे भूमिपूजन केले होते तो संकल्प पूर्ण करण्याचे वचन आजिनाथ किर्तने यांनी दिले आहे.



# हायवार्ड गाडीने तिघांना चिरडले उपचारादरम्यान महिलेचा मृत्यू

**पाथर्डी । प्रतिनिधी**

पाथर्डी तालुक्यातील खरवंडी पाथर्डी लोहा कंधार ३६१ एफ राष्ट्रीय महामार्ग रोडवर झालेल्या भीषण अपघातात हायवार्ड या चारचाकी गाडीने मोटरसायकलवर चाललेल्या तिघांना अर्धा किलोमीटर गाडीखाली चिरडत नेले या गंभीर अपघातात मालेवाडी येथील शेतकरी कुटुंबातील ऊसतोडमजूर असलेल्या आशाबाई शिवाजी दराडे वय ५२ यांचा अहिल्यानगर येथील खाजगी साईदीप हॉस्पिटल येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला तर मनीषा रमेश दराडे व सचिन शिवाजी दराडे या अपघातात गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर साईदीप हॉस्पिटल येथे उपचार सुरू आहेत पाथर्डी पोलीस ठाण्याचे हेड कॉन्स्टेबल सुहास बटुळे अशोक बडे प्रल्हाद पालवे संदीप कानडे यांनी घटनास्थळी येऊन अपघाताचा पंचनामा केला आहे व पुढील तपास करत आहेत.



चार चाकी गाडी शिकण्यासाठी शिक्षकाने घेतला आशाबाईंचा जीव ढाकणवाडी येथील रहिवासी असलेल्या व पाथर्डी शहरातील श्री तिलोक जैन विद्यालय येथे उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक सचिन ढाकणे यांनी चार चाकी गाडी शिकण्यासाठी खरवंडी कासार पाथर्डी रोडवर आशाबाई दराडे मनीषा दराडे व सचिन दराडे या तिघांना गाडीखाली चिरडत नेले चार चाकी गाडी शिकत असताना गाडीवरील ताबा सुटला आणि विरुद्ध दिशेने येणाऱ्या दराडे कुटुंबीयांना अपघातात गंभीर जखमी केले यात आशाबाई दराडे यांचे दुर्दैवी निधन झाल्याने मालेवाडी गावावर शोककळा पसरली आहे. शिक्षक सचिन ढाकणे यांनी गाडी शिकण्यासाठी निष्पाप ऊसतोड मजूर महिला आशाबाई दराडे यांचा अपघातात जीव घेतला तर मनीषा दराडे व सचिन दराडे हे गंभीर जखमी झाले असल्याने मोटार वाहन कायदा १९८८ विना परवाना गाडी चालवणे निष्काळजीपणे गाडी चालवून निष्पाप व्यक्तींचा अपघातात जीव घेणे अशा विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून सचिन ढाकणे यास तातडीने अटक करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

# 'झिरो ब्युरोक्रसी'कडे शासनाची वाटचाल; प्रशासनाने 'स्टार्टअप'सारखे काम करावे-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील प्रशासन अधिक पारदर्शक, गतिमान आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी 'झिरो ब्युरोक्रसी'ची संकल्पना राबविण्याचा निर्धार व्यक्त करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाने 'स्टार्टअप'प्रमाणे कार्य करण्याची गरज व्यक्त केली. सुलभ प्रक्रिया, पूर्वानुमेय आणि मानवी हस्तक्षेप कमी करून पात्र नागरिकांना थेट सेवा देणे हेच 'झिरो ब्युरोक्रसी'चे मूळ तत्त्व असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.**

नागरी सेवा दिन २०२६ आणि 'राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा २०२५-२६' अंतर्गत पारितोषिक वितरण सोहळ्यात ते बोलत होते. या सभारंभास कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव पंकजकुमार तसेच पुरस्कारार्थी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रशासनातील नाविन्यपूर्ण उपक्रमांची 'स्टार्टअप'शी तुलना करत, प्रत्येक विभागाने स्वतःकडे एक स्वतंत्र स्टार्टअप म्हणून पाहिले पाहिजे, असे सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, झिरो ब्युरोक्रसी म्हणजे अधिकारी नसणे नव्हे, तर प्रक्रियांची पुनर्रचना (री-इंजिनिअरिंग) करून त्या अधिक सुलभ आणि पारदर्शक करणे होय. कोणत्याही व्यक्तीच्या पसंती-अपसंतीवर सेवा अवलंबून न राहता,



पात्रतेनुसार सेवा मिळाली पाहिजे. या शासनाने १०० दिवस आणि १५० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत प्रशासनातील कार्यक्षमता वाढवण्यावर भर दिला असून, त्यातील ८५ टक्के उद्दिष्टे पूर्ण करण्यात यश आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून 'इज ऑफ डुइंग बिझनेस' सुधारण्यासाठी विविध प्रक्रियांचे सुलभीकरण करण्यात आले आहे. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'विकसित महाराष्ट्र २०४७'चा आराखडा मांडताना २०२९, २०३५ आणि २०४७ हे तीन टप्पे निश्चित केल्याचे सांगितले. ''महाराष्ट्र आता देशांतर्गत नव्हे तर जागतिक पातळीवर स्पर्धा करत आहे. राज्याची अर्थव्यवस्था जगातील ३०व्या क्रमांकावर असून, आगामी काळात ती आणखी बळकट होईल,'' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रशासनातील सेवा वितरण सुधारण्यासाठी २० महत्त्वाच्या सेवांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले असून, 'आपले सरकार २.०'च्या माध्यमातून नागरिकांना अधिक सुलभ सेवा देण्याची तयारी सुरू असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, प्रशासनातील प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांनी आपल्या कामाकडे 'स्टार्टअप'च्या दृष्टिकोनातून पाहिल्यास नावीन्य, कार्यक्षमता आणि वेग यांचा संगम साधता येईल. अशा उपक्रमांमुळेच प्रशासन 'झिरो ब्युरोक्रसी'कडे वाटचाल करू शकते. यावेळी मुख्यमंत्र्यांनी नाविन्यपूर्ण आणि परिवर्तनशील कामगिरी करणाऱ्या अधिकाऱ्यांचा गौरव करून ''प्रशासनातील कल्पकता आणि नव्या कल्पनांची अंमलबजावणी हीच भविष्यातील बदलाची दिशा ठरेल,'' असे सांगत त्यांनी सर्व पुरस्कारार्थ्यांचे अभिनंदन केले.

# खोटी बातमी प्रसिद्ध केल्यामुळे तहसीलदाराची वृत्तपत्राच्या मालकाला नोटीस

**जालना । प्रतिनिधी**

**२१ एप्रिल २०२६ रोजीच्या एका वृत्तपत्रांमध्ये' होती बातमी प्रसिद्ध करण्यात आली आहे. यासंदर्भात संबंधित वृत्तपत्राच्या मालकाला कायदेशीर नोटीस देण्यात आली आहे.**

झालेल्या खोट्या, तथ्यहीन व बदनामीकारक बातमीचे प्रशासनाकडून जाहीर खंडन आणि कायदेशीर नोटीस देण्यात आली आहे.अंबड तालुक्यातील सर्व पत्रकार, माध्यमे आणि नागरिकांना या प्रेस नोटद्वारे कळविण्यात येते की, '' या वृत्तपत्राने त्यांच्या दिनांक २० एप्रिल २०२६ च्या अंकामध्ये तडीपार माफियांसोबत विजय चव्हाण यांची भागीदारी? आणि तहसीलदार चव्हाण व एपीआय खांडेकर यांच्यावर रासुका लावा जनतेची मागणी''अशा मथळ्याखाली अत्यंत मोघम आणि तथ्यहीन बातमी प्रसिद्ध केली आहे. ही बातमी वस्तुस्थितीला धरून नसून, जाणीवपूर्वक माझी आणि महसूल प्रशासनाची बदनामी करण्याच्या उद्देशाने छापण्यात आली आहे. या संदर्भात महसूल प्रशासनातर्फे या बातमीचे तीव्र खंडन करण्यात येत असून, संबंधित वृत्तपत्राचे मुख्य संपादक व वार्ताहर यांना कायदेशीर नोटीस बजावण्यात आली आहे . सदरील वर्तपत्र रद्द करण्यासंदर्भात संबंधित विभागाकडे तक्रार करण्यात येणार आहे.

# किसान क्रेडिट कार्डवर मिळणार ३ लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज

**जालना । प्रतिनिधी**

**राज्यातील पशुपालक, शेळी-मेंढीपालन आणि कुक्कुटपालन करणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक बळ देण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्डयोजना प्रभावीपणे राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या मोहिमेअंतर्गत पशुपालकांना त्यांच्या पशुधनाच्या संगोपनासाठी आणि दैनंदिन खर्चासाठी ३ लाख रुपयांपर्यंतचे खेळते भांडवल आकर्षक व्याज सवलतीसह उपलब्ध करून दिले जाणार आहे.**

ज्या शेतकऱ्यांकडे अद्याप क्रेडिट कार्ड नाही, त्यांना १.६० लाखांपर्यंतचे कर्ज कोणत्याही तारणाशिवाय मिळेल. दूध संघाने हमी दिल्यास ही मर्यादा ३ लाखांपर्यंत वाढवता येईल. कर्जाचा मूळ व्याजदर ९ टक्के असला तरी, नियमित कर्जफेड करणाऱ्यांना केंद्र व राज्य सरकारकडून एकूण ७ टक्के व्याज सवलत मिळणार आहे. त्यामुळे जागरूक पशुपालकांसाठी हे कर्ज प्रत्यक्ष शुन्य टक्के व्याजदराने उपलब्ध होऊ शकते.या योजनेचा लाभ घेण्यासाठी पशुधनाची भारत पशुधन पोर्टलवर नोंदणी असणे अनिवार्य आहे. तसेच लाभार्थ्याने यापूर्वी कोणत्याही सरकारी अनुदान योजनेचा लाभ घेतलेला नसावा. राज्यातील १० लाख पशुपालकांपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट विभागाने ठेवले आहे. अधिक माहितीसाठी जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात किंवा १९६२ या हेल्पलाइनवर संपर्क साधावा, असे आवाहन पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागाने प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# आरटीई प्रवेशासाठी ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ; चुकीची माहिती देणाऱ्या पालकांवर गुन्हे दाखल करा-मनोज जाधव

**बीड । प्रतिनिधी**

**शिक्षण हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेला आता ३० एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यापूर्वी ही मुदत २० एप्रिलपर्यंत होती; मात्र प्रवेशाची संथ गती आणि प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची कमी संख्या लक्षात घेता प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. दरम्यान, या प्रक्रियेत खोटी कागदपत्रे सादर करून गोरगरिबांच्या हक्कावर डल्ला मारणाऱ्या श्रीमंत पालकांवर गुन्हे दाखल करण्याची आक्रमक मागणी शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केली आहे.**

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, या उद्देशाने आरटीई प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. मात्र, आता यात श्रीमंत आणि धनदांडगे पालक गरिबांच्या हक्काच्या जागांवर डल्ला मारत असल्याचे चित्र दिसत आहे. बनावट कागदपत्रे तयार करून मोठ्या प्रमाणात बोगस प्रवेश घेतले जात आहेत. या प्रकाराला कुठेतरी लगाम लागला पाहिजे आणि खऱ्या लाभार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळाली पाहिजे. यासाठी शिक्षण विभागाने कडक पावले उचलून बोगस प्रवेश रद्द करावेत आणि संबंधित पालकांविरुद्ध कठोर कारवाई करावी, अशी मागणी मनोज जाधव यांनी केली आहे. जिल्ह्यातील एकूण २१४ शाळांमध्ये २ हजार ४२५जागा आरक्षित आहेत. या जागांसाठी ६ हजार ३१६ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी २ हजार ३६० विद्यार्थ्यांची निवड लॉटरीद्वारे करण्यात आली असून, आतापर्यंत १हजार ३२७ विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश निश्चित केले आहेत. उर्वरित पालकांना आता ३० एप्रिलपर्यंत कागदपत्र पडताळणी पूर्ण करून प्रवेश घेण्याची अंतिम संधी मिळणार आहे. प्रवेश प्रक्रियेत अनेक श्रीमंत, नोकरदार आणि व्यावसायिक पालकांनी आपली मुले नामांकित शाळांत लागावीत यासाठी चुकीचे



'लोकेशन', उत्पन्नाचे खोटे दाखले आणि बनावट भाडेपत्रे ( ) सादर केल्याचे समोर आले आहे. शहरातील सुमारे ५६ पालकांच्या कागदपत्रांवर पडताळणी समितीने आक्षेप नोंदवला असून, ही संख्या वाढण्याची शक्यता आहे. संशयित पालकांच्या अर्जात नमूद केलेल्या पत्त्याची आता गटशिक्षणाधिकारी कार्यालयामार्फत नेमलेली समिती 'घरोघरी' जाऊन प्रत्यक्ष तपासणी करणार आहे. या तपासणीत माहिती खोटी आढळल्यास संबंधित पाल्याचा प्रवेश रद्द करून पालकांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी मनोज जाधव यांनी प्रशासनाकडे केली आहे. ''खरे लाभार्थी असलेल्या गोरगरीब विद्यार्थ्यांच्या जागी जे श्रीमंत पालक खोटी कागदपत्रे देऊन प्रवेश मिळवत आहेत, त्यांच्यावर पोलिसांमार्फत कठोर कारवाई झालीच पाहिजे. प्रशासनाने या फसवणुकीला गांभीर्याने घेऊन दोषींवर गुन्हे नोंदवावेत.''



## कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना प्रशासकीय इमारत, घनसावंगी

npghansawangi@gmail.com

**जा.क्रं.२०२६/नपघ/जा.प्र./कावी-**
**दिनांक: २१/४/२०२६**
**-: जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार सुभाष उत्तम साबळे रा. कोठाळा बु ता. घनसावंगी जि.जालना यांनी नामे १. शेख वलीयोद्दीन नसीरोद्दीन २. शेख मुमताज फहीमोद्दीन रा.ता.बीड जि.बीड यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं १८६४ दि. ३०/०५/२०२२ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं. १८२ दिनांक:- २०/०४/२०२६ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. शेख वलीयोद्दीन नसीरोद्दीन २. शेख मुमताज फहीमोद्दीन रा.ता. बीड जि.बीड नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. ३७ सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं. १७०५/३७ मधील क्षेत्र ८३.८७५ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- ९ मीटर कॉलनी अंतर्गत रोड
पश्चिमेस : प्लॉट नं. २६
दक्षिणेस : प्लॉट नं. ३६
उत्तरेस :- प्लॉट नं. ३८

या वरील चतु:सिमा मधील क्षेत्र ८३.८७५ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत घनसांवगी**


# सरकारी कर्मचारी यांचा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मंडप टाकून निदर्शने

**जालना । प्रतिनिधी**

दिनांक २१ एप्रिल २०२६ रोजी पासून महाराष्ट्र राज्यातील सर्व राज्य सरकारी कर्मचारी बेमुदत संपावर गेले आहे. जालना जिल्ह्यातील राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या नेतृत्वात जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयतिल कर्मचारी संपात सहभागी आहेत. सदर संप कर्मचाऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या एकूण १८ प्रलंबित मागण्यासाठी करण्यात येत आहे. मागण्यांची यादी सोबत जोडली आहे. जालना जिल्ह्यातील जवळपास ९०%



राज्य शासकीय कर्मचारी संपात सहभागी आहेत आज सकाळी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात जिल्ह्यातील विविध कर्मचारी संघटनांचे अध्यक्ष सचिव पदाधिकारी व राज्य सरकारी कर्मचारी मोठ्या संख्येने जमा झाले व प्रलंबित मागण्यासाठी आपला आक्रोश व्यक्त केला याप्रसंगी जालना जिल्हा राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे जिल्हा अध्यक्ष श्री पी.बी मते जिल्हा सरचिटणीस श्री याहया पठाण उपाध्यक्ष श्री चंद्रहास कार्याध्यक्ष श्री राजेंद्र शिंदे महसूल कर्मचारी सचिव श्री अरुण डुकरे महसूल कर्मचारी पतसंस्थेचे जिल्हाध्यक्ष श्री उद्धव मिसाळ शासकीय परिचारिका संघटनेचे श्री उगले व श्रीमती पडोळ मॅडम डीडीआर सहकारी संस्था कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष ,राज्य सरकारी चतुर्थ श्रेणी कर्मचारी महासंघ जिल्हाध्यक्ष तसेच विविध विभागातील कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सरचिटणीस पदाधिकारी कर्मचारी आरोग्य कर्मचारी परिचारिका इत्यादी मोठ्या संख्येने उपस्थित होते.वर्षानुवर्षे प्रलंबित असणाऱ्या सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची अंमलबजावणी करण्याबाबतची विस्तृत अधिसूचना तात्काळ जारी करण्यात यावी.

दैनिक
# राज्य लोकतंत्र

बुधवार दि.२२ एप्रिल २०२६ | ६

# सावरगावची वाळू खरडून काढली आता वाळू माफियांचा मोर्चा सावळेश्वरकडे
## पोलीस, महसूल आणि स्थानिक नेत्यांच्या आशीर्वादाने अवैध वाळू उपसा सुरूच!

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील गोदावरी पात्रातील सावरगाव या ठिकाणी वाळूची निविदा मंजूर करण्यात आली होती. आता या ठिकाणची वाळू, वाळू माफियांनी खरडून काढली. त्यानंतर ज्या ठिकाणी निविदास मंजूर झालेली नाही अशा सावळेश्वर वाळू घाटावर वाळू माफियांचा मधल्या मार्गाने सुळसुळाट चालू असून शेतकऱ्यांच्या शेतातून अवैधरित्या गाड्या नेऊन या ठिकाणचा वाळू उपसा पोलीस, महसूल आणि स्थानिक नेत्यांच्या आशीर्वादाने चालू असून शेतकऱ्यांनी तक्रार केली तर त्यांना दम दिला जातो. या प्रकारावर

### वाळू माफियांनी शेतकऱ्यांच्या शेताची राख रांगोळी केली

जिल्हाधिकारी पोलीस अधीक्षक आवर घालणार काय? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.

गेवराई तालुक्यातील सावरगाव येथे वाळू उपसा करण्यासाठी आणि तोही मर्यादितया अटीवर शासनाने निविदा काढली होती. वास्तविक पाहता नियमानुसार काही वाळू खाली शिल्लक ठेवणे गरजेचे असतानाही या ठिकाणची सर्वच वाळू या वाळूमाफियांनी खरडून काढली. निविदेनुसार वाळू उपसा न करता अवैधरित्या मोठ्या प्रमाणात वाळू उपसा करून सावरगावच्या बाळू घाटाचे तीन तेरा वाजवले. आता या ठिकाणी वाळू शिल्लक राहिली नसल्याने आता या वाळूमाफियांनी आपला मोर्चा येथून जवळच असलेल्या सावळेश्वर येथील वाळू घाटाकडे वळवला आहे. वास्तविक पाहता सावळेश्वर घाटाच्या निविदा काढण्यात आलेल्या नाहीत. तरीही अवैधरित्या ◀◀ पान ३ वर



### फुफाट्याने शेतकरी त्रस्त

सावरगाव येथून चोरट्या मार्गाने सावळेश्वर कडे शेतकऱ्यांच्या शेतातून अवैधरित्या वाहने नेली जातात. वास्तविक पाहता या परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पिके आहेत. मात्र या धुराळ्याने पिकाची वाट लागली असून शेतकरी या प्रकाराने त्रस्त झाले आहेत. मात्र याची दखल कोणीही घ्यायला तयार नसल्याने शेतकरी हातबल झाला आहे. सावरगाव सावळेश्वर व खामगाव या तीन गावातील शेतकरी या प्रकारामुळे त्रस्त झाले आहेत.

### स्थानिक नेत्याचा आशीर्वाद

सावरगाव मार्गे सावळेश्वर कडे अवैध वाळू उपसा करण्यामागे गेवराईच्या एका स्थानिक नेत्याचा हात असल्याचे बोलले जात असून या नेत्याच्या जीवावर या ठिकाणचा वाळू उपसा चालू आहे. शेतकऱ्यांनाही हे लोक दाद देत नसल्याने शेतकरी ही त्रस्त आहेत.

# चाकूने वार करून रॉबरी करणारा आरोपी जेरबंद

बीड । प्रतिनिधी

शहर पोलिसांनी गंभीर गुन्ह्यातील फरार आरोपीस अटक करून उल्लेखनीय कामगिरी केली आहे.दि. ०५/०४/२०२६ रोजी सायंकाळी अंदाजे ०५.०० वा. बस स्थानक समोर, वंदना हॉटेल, बीड येथे फिर्यादी उमेश सुनील पारिक (वय ३० वर्षे, रा. काशी नगर, जालना रोड, बीड) यांच्यावर आरोपीने चाकूने वार करून जबरदस्तीने मोबाईल फोन लुटला होता. सदर घटनेत फिर्यादीच्या तोंडावर व पाठीवर मारहाण करून जखमी करण्यात आले असून, त्यांच्या खिशातील ओप्पो -११ कंपनीचा मोबाईल (अंदाजे किंमत रु. २०,०००/-) जबरदस्तीने



काढून आरोपी घटनास्थळावरून फरार झाला होता.

या प्रकरणी पोलीस स्टेशन बीड शहर येथे गुन्हा क्रमांक ००७४/२०२६ प्रमाणे भारतीय न्याय संहिता कलम ३०९ (६) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान पोलिसांनी माहितीकारांचे जाळे व तांत्रिक विश्लेषणाचा वापर करून आरोपीचा शोध घेत अखेर विनोद मुळे (रा. भाजी मंडई, बीड शहर) यास ताब्यात घेऊन अटक केली. त्याच्याकडून गुन्ह्यातील मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. सार्वजनिक ठिकाणी दहशत निर्माण करणारे, मारामारी व रॉबरीसारखे गंभीर गुन्हे करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे निर्देश पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत यांनी दिले असून, त्यानुसार ही तात्काळ कारवाई करण्यात आली आहे.

अशा गुन्हेगारांवर पुन्हा गुन्हे होऊ नयेत यासाठी प्रतिबंधात्मक कारवाईही करण्यात येणार आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत यांच्या मार्गदर्शनाखाली, अपर पोलीस अधीक्षक बीड श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. व्यंकट राम यांच्या देखरेखीखाली, पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, पोलीस हेड कॉन्स्टेबल जाधव यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# सिरसदेवी येथे एलसीबीचा छापा ८ किलो गांजासह एकाला अटक

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात अंमली पदार्थांच्या विरोधात पोलिसांनी मोहीम तीव्र केली असून, स्थानिक गुन्हे शाखेने गेवराई तालुक्यातील सिरसदेवी येथे मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत सुमारे ८ किलो ८८८ ग्रॅम वजनाचा गांजा जप्त करण्यात आला असून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

दिनांक २० एप्रिल २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड



यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, मौजे सिरसदेवी येथे एक व्यक्ती बेकायदेशीरपणे गांजा बाळगून त्याची विक्री करत आहे. या माहितीची खातरजमा करून तात्काळ कारवाई करण्याचे आदेश पोलीस निरीक्षकांनी पथकाला दिले.

घरावर छापा आणि मुद्देमाल जप्त

मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी सिरसदेवी येथील शेख रईस शेख युसूफ (वय २५ वर्ष) याच्या घरावर छापा टाकला. यावेळी त्याच्या घरातून २ लाख ६६ हजार ६४० रुपये किमतीचा ८ किलो ८८८ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. याप्रकरणी तलवडा पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध एन.डी.पी.एस. कायद्याच्या कलम ८(क) आणि २०(ब) नुसार गुन्हा दाखल ◀◀ पान ३ वर

# शिक्षक नेते सुभाष वीर यांची कन्या डॉ.साक्षीचे एमबीबीएसमध्ये यश

बीड । प्रतिनिधी

येथील प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हा कार्याध्यक्ष तथा बीड तालुक्यातील वांगी येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सुभाष वीर यांची कन्या डॉ. साक्षी वीर हिने एमबीबीएसच्या अंतीम वर्षाच्या परिक्षेत घवघवीत यश मिळविले आहे.

डॉ. साक्षी सुभाष वीर हिचे प्राथमीक शिक्षण बीड येथील चंपावती विद्यालयात झाले तर महाविद्यालयीन शिक्षण लातूर येथील राजर्षी शाहू कॉलेजमध्ये झाले. पहिल्याच प्रयत्नात नीट परिक्षेत यश



मिळविल्यानंतर, साक्षीला छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळाला. अंतीम वर्षाचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, यामध्ये डॉ. साक्षीने घवघवीत यश मिळवले आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये झालेल्या शानदार सोहळ्यात तिला पदवी प्रदान करण्यात आली. आई, वडील, भाऊ व इतर नातेवाईकांच्या उपस्थितीत डॉ. साक्षीने मान्यवरांच्या हस्ते पदवी स्विकारली. डॉ. साक्षी हिच्या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# उद्योजक राहुल लोखंडे यांची आत्महत्या; परिसरात हळहळ

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील तरुण व यशस्वी उद्योजक राहुल भारत लोखंडे यांनी आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे बीड शहरासह परिसरात मोठी खळबळ उडाली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

राहुल लोखंडे हे 'नरेंद्र हार्डवेअर अँड स्टोअर्स' या नावाने व्यवसाय करत होते. त्यांचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरू असून कमी वयातच त्यांनी यशाची शिखरे गाठली होती.



मेहनत, जिद्द आणि व्यावसायिक कौशल्याच्या जोरावर त्यांनी अल्पावधीतच स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यामुळे ◀◀ पान ३ वर

# सहयोगनगर येथील गजानन महाराज मंदीरात गुरूवारी शिवलिंग चलप्राणप्रतिष्ठा

बीड । प्रतिनिधी

वैशाख शुक्ल सप्तमी, गंगा उत्पत्ती दिनानिमित्त गुरुवार, दि.२३ एप्रिल रोजी शहरातील सहयोगनगर येथील श्रीगजानन महाराज मंदिरात 'श्रीमहादेव-श्रीनंदी' यांसह 'हरीहर शिवलिंग'चा चलप्राणप्रतिष्ठा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या विशेष शिवलिंगामध्ये ब्रह्मा, विष्णू व महेश यांचे एकत्रित दर्शन घडणार असल्याने भाविकांसाठी हा दुर्मीळ आध्यात्मिक योग मानला जात आहे.



मातीचा साचा, त्यानंतर फायबर व मेणाच्या साच्यांद्वारे ओतीव पितळी धातूपासून या शिवलिंगाची निर्मिती करण्यात आली आहे. चैत्र कृष्ण चतुर्दशी, दि. १६ एप्रिल रोजी 'शिवलिंग उत्पत्ती' दिनी शिल्प पूर्णत्वास गेले. दि.१८ एप्रिल रोजी हे शिवलिंग शिल्पकाराकडून श्रीक्षेत्र शेगाव येथे नेण्यात आले असून, अक्षय तृतीया मुहूर्तावर दि.१९ एप्रिल रोजी बीड येथे आगमन झाले. प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाची सुरुवात पहाटे ५.३० ते ८.१५ या वेळेत श्रीगणेश, श्रीविठ्ठल-रुख्मिणी, श्रीगजानन महाराज, श्रीगुरुदेव दत्त व श्रीराम पंचायतन दैवतांच्या पूजनाने होईल. त्यानंतर सकाळी ८.३० ते ११.३० दरम्यान 'हरीहर शिवलिंग'वर रुद्राभिषेक पार पडणार आहे. दुपारी १२ वाजता महाआरती होऊन महाप्रसादाला प्रारंभ होईल. या सोहळ्यास भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन श्री गजानन सांस्कृतिक मंडळ, सहयोग नगर बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# ढेकनमोहा येथे रक्तदान शिबिर, नेत्र तपासणी व आरोग्य शिबिर मोठ्या उत्साहात संपन्न

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील ढेकनमोहा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती तसेच माजी सरपंच नागेश शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित भव्य रक्तदान शिबिर, नेत्र तपासणी व आरोग्य शिबिर मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावेळी कार्यक्रमासाठी राजू जोगदंड रिपाई जिल्हा सरचिटणीस,

गंगाधर घुमरे माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष, मधुसूदन घुगे पोलीस निरीक्षक पिंपळनेर, सुधीर काकडे राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष बीड, मायाताई मिसळे



रिपाई जिल्हाध्यक्ष बीड, भगीरथ बांडे माजी सरपंच आंबेसावळी, अच्युत शेळके माजी पंचायत समिती सदस्य, अशोक वाघमारे सरपंच वांगी, विक्रम डोळस माजी उपसरपंच शिवनी, सुभाष तांगडे युवक रिपाई तालुका अध्यक्ष, गणपत शिंदे, कैलास देवकते, परमेश्वर थापडे उपसरपंच, भगवान देवकते, सर्जेराव जाधव, दिलीप देवकते, संदीप डावकर सरपंच मौज, भारत देवकते, भारत होंडरे, श्याम सुंदर जाजू, भीमराव घोडेराव, गणेश प्रधान, सुशील जावळे, मुकेश निसर्गंध, डॉ. अजय घोरड, डॉ. किशोर वरपे, गोवर्धन दराडे, ओम प्रकाश खवतड, बाबुराव भालेराव, प्रशांत निसर्गंध, पंडित सर, राठोड सर, अंगद खवतड, अमर पाशा, डॉ. सय्यद साहेब, राहुल डावकर, भीमा होडरे, बाबासाहेब डोंगरे, दिलीप शिंदे संचालक, कपिल तांगडे, अंकुश थोरात, राहुल कोरडे, अमोल जाधव, बबन लांडे, असलम पठाण, प्रदीप घोरड, ◀◀ पान ३ वर

# बांधकाम परवाना मागणाऱ्या ७६ वर्षीय वृद्धाला सरपंचाकडून मारहाण; जिवे मारण्याची धमकी

घाटनांदूर । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील जवळगाव येथील ग्रामपंचायत कार्यालयात बांधकाम परवाना मागण्यासाठी गेलेल्या ७६ वर्षीय वृद्धाला गावच्या सरपंचाने मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी बार्दापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गावच्या प्रथम नागरिक असणाऱ्या व्यक्तीकडून वृद्ध व्यक्तींना अशाप्रकारे मारहाण होणे ही अतिशय निंदनीय घटना आहे. जवळगाव येथील सरपंच भगवान हारे यांच्याकडून अशाप्रकारचे कृत्य होण्याची ही पहिली वेळ



नाही. यापूर्वी देखील त्यांच्याकडून आशास्वरूपाचे कृत्य घडले आहे; त्यामुळे येथील मुजोर सरपंचाची गुंडगिरी आता जनतेसमोर येत आहे.

फिर्यादी रखमाजी रामभाऊ गाडवे (वय ७६, रा. जवळगाव) हे १५ एप्रिल रोजी दुपारी दीडच्या सुमारास आपल्या घराच्या बांधकाम परवानगीसाठी जवळगाव येथील ग्रामपंचायत कार्यालयात गेले होते. यावेळी गावाचे सरपंच भगवान रावसाहेब हारे तिथे उपस्थित होते. गाडवे यांनी सरपंचांकडे बांधकाम परवानगीबाबत विचारणा केली असता, सरपंच भडकले.

सरपंचाने गाडवे यांना ''तुला कशाचे बांधकाम करायचे आहे? तू इथून निघून जा,'' असे म्हणत शिवीगाळ केली. गाडवे यांनी शिवीगाळ करण्यास विरोध केला असता, सरपंचाने त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यात गाडवे यांच्या डाव्या कानावर मार लागल्याने ते जखमी झाले. इतकेच नाही तर, ''जर तू आता इथून गेला नाहीस, तर तुला जिवे मारून टाकीन,'' अशी धमकीही सरपंचाने दिली. मारहाणीनंतर गाडवे यांनी आपल्या मुलाला ◀◀ पान ३ वर

# आष्टीत एसीबीचा सर्जिकल स्ट्राईक महावितरणची महिला सहाय्यक अभियंता रंगेहाथ

आष्टी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील भ्रष्टाचाराच्या वाढत्या सावटावर निर्णायक प्रहार करत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी) ने आष्टी येथे धडक कारवाई केली. महावितरणच्या महिला सहाय्यक अभियंत्याला लाच स्वीकारताना रंगेहात पकडल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. सरकारी यंत्रणेत शिरलेल्या लाचखोरीच्या विषाणूवर एसीबीने केलेली ही कारवाई 'सर्जिकल स्ट्राईक' ठरली आहे.

लाच मागणी ते रंगेहात अटक - संपूर्ण कारवाईचा थरार

आष्टी येथील महावितरण कार्यालयात कार्यरत सहाय्यक अभियंता कोमल अर्जुन शिंदे यांनी तक्रारदाराकडून सौर ऊर्जा प्रकल्पाचे ऑडिट पूर्ण करून निधी मंजुरी (फंड रिलीज) करण्यासाठी १८ हजार रुपयांची लाच मागितल्याची धक्कादायक बाब समोर आली.

तक्रारदाराने धाडस दाखवत एसीबीकडे तक्रार नोंदवली. प्राथमिक पडताळणीत आरोप खरे ठरल्यानंतर एसीबीने बारकाईने सापळा रचला. नियोजनानुसार दुपारी सुमारे २ वाजता आरोपी शिंदे लाच स्वीकारताच एसीबीच्या पथकाने झडप घालत रंगेहात ताब्यात घेतले.

कारवाईमागील टीमवर्क

या धडक कारवाईचे नेतृत्व पोलीस उपाधीक्षक सोपान चितमपल्ले यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी खरसाडे, बीडकर व पुरी यांच्या पथकाने अचूक नियोजन आणि वेगवान अंमलबजावणी करत ही कारवाई यशस्वी केली.

सध्या गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास वेगाने सुरू आप्रशासन हादरले; महावितरणमध्ये खळबळ या घटनेनंतर महावितरण विभागात प्रचंड खळबळ उडाली आहे. सर्वसामान्य नागरिकांकडून वारंवार येणाऱ्या तक्रारींना प्रत्यक्ष पुरावा मिळाल्याने 'लाच दिल्याशिवाय काम होत नाही' ही भावना पुन्हा अधोरेखित झाली आहे.वाढता भ्रष्टाचार - नागरिकांचा संताप टोकाला

बीड जिल्ह्यातील विविध शासकीय विभागांमध्ये लाचखोरीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे.

सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी लाच द्यावी लागते, ही लोकशाहीसाठी घातक बाब आहे. दोषींवर कठोर आणि उदाहरणात्मक ◀◀ पान ३ वर

# अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरण विरोधात लिंबागणेश येथे निदर्शने; ११ मे बीड मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन

लिंबागणेश । प्रतिनिधी

केंद्र व राज्य सरकारकडून अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाचा प्रस्ताव पुढे आल्याच्या पार्श्वभूमीवर आंबेडकरवादी समाज आक्रमक झाला असून लिंबागणेश येथे निदर्शने करण्यात आली. बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात भिम टायगर ग्रुपचे जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन पार पडले.

सरकारकडून अनुसूचित जातीतील ५९ जातींचे अ, ब, क, ड अशा गटांमध्ये उपवर्गीकरण करण्याचा प्रस्ताव असल्याची माहिती समोर येत असून, या निर्णयामुळे समाजात फुट पडण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.



सामाजिक ऐक्य धोक्यात येईल, विविध घटकांमध्ये संघर्ष व अविश्वास वाढेल, अशी भीती आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. यावेळी सरकारविरोधात घोषणाबाजी करण्यात आली.

फडणवीस सरकारने नेमलेल्या न्या. अनंत बदर समितीचा अहवाल अद्याप सार्वजनिक न करता हरकती व सूचना मागवण्यात आल्यामुळे आंबेडकरी समाजात नाराजी असल्याचे निदर्शनास आले. समितीचा अहवाल तातडीने जाहीर करावा, ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# ...तर आपण करंटे ठरू, देवेंद्र फडणवीसांचं बारामतीकरांना आवाहन; म्हणाले, अजित दादांच्या स्मृतीयज्ञात आहुती द्यायचीय

**मुंबई । प्रतिनिधी**

बारामती येथील सभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी अजित पवारांच्या आठवणींना उजाळात देत सुनेत्रा वहिनींना रेकॉर्ड ब्रेक मतांनी विजयी करण्याचं आवाहन बारामतीकरांना केलं. बारामतीची आजची सांगता सभा म्हणजे अजित दादांच्या स्मृतीचा हा यज्ञ सुरू आहे, या यज्ञात आपली आहुती टाकली नाही तर मनात काहीतरी हुर हुर राहिली असती. त्यामुळेच, दादांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आम्ही इथं आलोय. सुनेत्रा वहिनींना सर्वाधिक रेकॉर्ड ब्रेक मतांनी विजयी करत, बारामतीकरांनी आपल्या मतांची आहुती या स्मृतीयज्ञात द्यायची आहे, नाहीतर आपण करंटे ठरू, असे म्हणत देवेंद्र फडणवीसांनी भावनिक आणि तितकंच जबाबदारीचं वक्तव्य केलं.

महाराष्ट्राच्या संस्कृतीत अनेकवेळा आपण पाहील आहे की, मोठा नेता गेल्यानंतर निवडणुक आपण बिनविरोध करतो. शरद पवार यांचे आभार मानतो, त्यांचा मला काल फोन आला होता. त्यांनी मला सांगितलं की, आमचा सुनेत्रा पवारांना पूर्ण पाठिंबा आहे. मी कॉंग्रेस प्रदेशाध्यक्षां देखील विनंती केली, त्यांनी ती विनंती मान्य केली. बारामतीमध्ये सभा घेताना माझ्यापैकी कुणीही आलं नसतं तरी बारामतीकरांनी रेकॉर्ड ब्रेक मतांनी सुनेत्रा वहिनींना निवडून दिले असते. आताचा काळ दादांच्या स्मृतींच्या आठवणींच्या यज्ञाचा काळ आहे. त्यामुळे, प्रत्येकजणाने आपली मतरुपी आहुती यात द्यायला पाहिजे. ती आहुती दिली नाही तर तो आपण स्वतःला करंटे ठरू, असे आवाहन फडणवीसांनी बारामतीकरांना केले. तसेच, बारामतीतून सर्वाधिक मतांनी निवडून येण्याचा रॉर्ड अजित दादांचा आहे, आता दादांच्या पश्चात रेकॉर्ड ब्रेक मतांनी वहिनी निवडून येतील, असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला.



दादांची स्वप्न पूर्ण करण्याची क्षमती वहिनींमध्ये

दादांच्या पश्चात वहिनींनी आपल्या हातात धुरा घेतली आहे. त्या काम करत आहेत, कर्तव्याच्या भावनेतून त्यांनी धुरा आपल्या हातात घेतली आहे. त्या खासदार झाल्यापासून राजकीय अनुभवातून धुरा त्यांनी हातात घेतली आहे. अजित दादांसोबत सामाजिक, आर्थिक, शिक्षण क्षेत्रात वहिनीनी काम केलं आहे. त्यामुळे राजकारण देखील त्यांनी जवळून बघितलं आहे. मी दाव्याने सांगतो मागील दोन अडीच महिन्यात वहिनींच काम पाहिलं, त्यानंतर मी दाव्याने सांगतो दादांची सगळी स्वप्न पूर्ण करण्याची क्षमता वहिनींमध्ये आहे.

दादांची स्वप्न, बारामतीची कामे पूर्ण करू

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्याची माहिती असणारे नेतृत्व म्हणजे अजित पवार, महाराष्ट्राला कुठे न्यायचं आहे याची कल्पना असणारे नेतृत्व म्हणजे अजित पवार होते. असं नेतृत्व तयार व्हायला खूप वाट पाहावी लागते. राज्याचे ११ अर्थसंकल्प त्यांनी मांडले. विकसित महाराष्ट्राची पायवाट होण्याचं काम त्यांनी केलं. दादा जाणं म्हणजे महाराष्ट्राच मोठं नुकसान झालं आहे. आम्ही एकमेकांच्या विरोधात काम केलं परंतु वैयक्तिक जिव्हाळा आमचा कधीच संपला नाही. दादांसोबत काम करण्याचा आनंद वेगळा होता, कारण दादांचा स्वभाव रोखठोक होता. सरकारी काम सर्वोत्तम दिसले पाहिजे यासाठी त्यांनी काम केलं. महाराष्ट्राला लावलेली आर्थिक शिस्त अतिशय महत्वाची आहे. निरा-कर्हा हा जोड नदीप्रकल्प त्यांच स्वप्न होतं हे काम आम्ही नक्कीच पूर्ण करू, बारामती पाणी पुरवठा, बारामती नीरा चौपदरीकरण विषय अशी एक न अनेक कामे दादांनी हातात घेतली होती, जी आम्ही पूर्ण करू, असा विश्वास फडणवीसांनी बारामतीकरांना दिला.

देशात सर्वाधिक मतांनी विजयी करा

दरम्यान, अजित पवारांच्या विमान अपघाताबाबत अनेकांच्या मनात शंका आहेत, मात्र, या अपघाताचं सत्य बाहेर आल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही, असे पुन्हा एकदा फडणवीसांनी बारामतीकरांना उद्देशून सांगितले. निवडणुकीची २३ तारीख दादांना श्रद्धांजली देण्याची तारीख आहे, मतदान रूपी आदरांजली देण्याची बारामतीकरांना संधी आहे, असे म्हणत सुनेत्रा पवारांना देशात सर्वाधिक मतांनी विजयी करण्याचं आवाहन मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणातून केलं.

# पुणे महापालिकेत 'हाय व्होल्टेज' ड्रामा; जाहिरात प्रस्तावावरून भिमाले-नायर आमनेसामने

पुणे: महापालिकेची तब्बल २ लाख ७१ हजार चौरस फूट मोक्याची जागा २० वर्षांच्या मुदतीसाठी जाहिरातदारांना देण्याच्या प्रस्तावावरून स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले आणि नवनियुक्त अतिरिक्त आयुक्त प्राजित नायर यांच्यात महापौरांच्या समोरच 'हाय व्होल्टेज' ड्रामा रंगला. प्रशासकीय शिस्त पाळणाऱ्या नायर यांनी या प्रस्तावाला कडाडून विरोध करताच, संतप्त झालेल्या भिमालेंनी 'तुम्हाला स्थायी समितीत बघून घेतो,' अशा शब्दांत थेट धमकी दिल्याने महापालिका वर्तुळात खळबळ उडाली आहे. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत सोमवारी हा धक्कादायक प्रकार घडला.

या प्रकरामुळे सत्ताधारी भारतीय जनता पक्षातील अंतर्गत मतभेद आणि प्रशासनावरील वाढता दबाव पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. महापालिकेची सर्वसाधारण सभा सुरू असतांना स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी महापौर व आयुक्त बसतात त्या ठिकाणी जात आयुक्त नवलकिशोर राम आणि नव्याने रुजू झालेले अतिरिक्त आयुक्त प्राजित नायर यांची भेट घेतली. महापालिकेच्या मालकीच्या वास्तू,



पादचारी पूल, आणि विजेच्या खांबांवर 'डिझाइन, बिल्ड, ऑपरेट अँड ट्रान्सफर' तत्त्वावर जाहिरातींचे हक्क देण्यासंबंधीच्या प्रस्तावाची मुदत संपत असल्याने तो तातडीने मंजूर करावा, अशी आग्राही भूमिका भिमाले यांनी घेतली.

मात्र, नायर यांनी महापालिका हिताचा विचार करून या धोरणात काही अटी आणि बदलांची आवश्यकता असल्याचे सांगत त्यासाठी फेरनिविदा राबवावी लागेल, असे सांगितले. त्यावर संतप्त झालेल्या भिमाले यांनी थेट अतिरिक्त आयुक्तांना दम भरत 'तुम्ही प्रस्ताव आणला नाही तर तुम्हाला बघून घेतो', असे सुनावले. त्यांचा हा पवित्रा बघून आयुक्तही अवाक झाले. तुम्ही आमच्या अधिकाऱ्यांशी अशा पद्धतीने बोलू शकत नाही, असे आयुक्तांनी भिमाले यांना सुनावले. त्यामुळे महापौरांच्या डायसवरच वादाला तोंड फुटले.

परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून महापौर मंजूषा नागपुरे यांनी सभागृह नेते गणेश बिडकर यांना पाचारण केले. मात्र, भिमाले यांचा पारा चढलेला होता. 'तुम्ही काम कसं करता तेच आता स्थायी समितीत बघतो,' असा सज्जड दम त्यांनी नायर यांना दिला. या प्रकारामुळे आयुक्त नवल किशोर राम यांनीही आक्रमक पवित्रा घेत लोकप्रतिनिधींच्या या वर्तणुकीला जशास तसे उत्तर दिले जाईल, असे उत्तर दिल्याचे समजते. दरम्यान, हा प्रकार अत्यंत अयोग्य असल्याचे सांगत वेळ पडल्यास वरिष्ठ पातळीवर दाद मागण्याचे संकेत आयुक्त राम यांनी दिले आहेत.

जाहिरात धोरणावरून उलट-सुलट चर्चा

या वादग्रास्त जाहिरात धोरणांतर्गत शहरातील ११ आधुनिक पादचारी पूल, डिजिटल युनिपोल्स आणि आकर्षक आर्च उभारण्याचे नियोजन आहे. 'रेव्हेन्यू शेअरिंग' मॉडेलवर आधारित या योजनेतून महापालिकेला वर्षाला ५० कोटी रुपयांचा महसूल मिळेल, असा दावा सत्ताधाऱ्यांकडून केला जात आहे. मात्र, शहराच्या मोक्याच्या जागा २० वर्षांसाठी खासगी कंपन्यांच्या ताब्यात देण्याच्या या निर्णयामुळे प्रशासकीय पातळीवर नाराजीचे सूर आहेत.

मी आयुक्तांकडे माझे चार प्रस्ताव घेऊन गेलो होतो. त्यावर मी त्यांच्याशी चर्चा करत होतो. आमचा कोणताही वाद झाला नाही. आमच्या वादाची बातमी पूर्णपणे चुकीची आहे.

श्रीनाथ भीमाले, स्थायी समिती अध्यक्ष

# पुण्यात सुषमा अंधारे यांचा फडणवीसांवर हल्ला; महिला आरक्षणावरून राजकीय वाद

पुणे: महिला आरक्षणावरून गळे काढणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांनी आधी स्वतःचा 'स्तर' तपासावा. त्यांच्यात चांगदेवाचा अहंकार भरला असून, त्यांनी सुप्रिया सुळे आणि प्रणिती शिंदे यांचा अपमान करून महिलांना तुच्छ लेखले आहे, अशा घणाघाती शब्दांत उबाठा शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर तोफ डागली. पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी फडणवीस, अमित शहा आणि पंतप्रधान मोदींच्या जुन्या ट्विट्सचा पाढा वाचत भाजपच्या 'दुटप्पी' भूमिकेवर जोरदार हल्ला चढवला.



अंधारे म्हणाल्या, जर २०२३ मध्येच महिला आरक्षण बिल मंजूर झाल्याचा दावा तुम्ही केला होता, तर आता विधेयक पडण्यामागे विरोधक जबाबदार कसे? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९५१ मध्ये महिलांच्या हक्कांसाठी मंत्रीपदाचा त्याग केला होता. महिलांसाठी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्याची तुमची तयारी आहे का? असा थेट प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

आरएसएसच्या वार्षिक कार्यक्रमात महात्मा फुले यांची 'गुलामगिरी' आणि 'शेतकऱ्याचा आसूड' ही पुस्तके वाचून दाखवावीत आणि त्यावर मोहन भागवतांची प्रतिक्रिया घ्यावी, असे आव्हान त्यांनी दिले. त्याचबरोबर २०२९ मध्ये केंद्रात पंतप्रधान आणि राज्यात मुख्यमंत्री म्हणून भाजप एखाद्या महिलेचा चेहरा समोर करणार का, असा पेच त्यांनी सत्ताधाऱ्यांसमोर टाकला.

विधेयकाची हत्या झाली म्हणणाऱ्या फडणवीसांना प्रत्युत्तर देताना अंधारे म्हणाल्या की, तुम्हाला 'भ्रूणहत्या' या शब्दाचे गांभीर्य नाही. खऱ्या अर्थाने महिला आरक्षणाची भ्रूणहत्या १९५१ मध्ये श्यामाप्रसाद मुखर्जी आणि मदन मोहन मालवीय यांनी केली होती, ज्यांनी बाबासाहेबांच्या बिलाला कडाडून विरोध केला होता.


चर्चेला येण्याचे खुले आव्हान

सुषमा अंधारे यांनी फडणवीसांना चर्चेचे खुले आव्हान दिले आहे. वेळ आणि दिवस तुम्ही ठरवा, मी एकटी तुमच्या सर्व प्रश्नांना उत्तरे द्यायला तयार आहे. जर तुम्ही चर्चेला आला नाहीत, तर तुम्ही सत्याला घाबरता असे सिद्ध होईल, असे त्या म्हणाल्या. तसेच, चित्रा वाघ यांचा उल्लेख 'चित्र-विचित्र' असा करत, तुमच्या सांगण्यावरून अंगावर येणाऱ्या एखाद्या महिलेला मुख्यमंत्री करून दाखवा, असे चॅलेंजही त्यांनी दिले.

# 'राजकारणी- एजंटांच्या संगनमतातून भूखंड हडपले', पुण्यात आणखी एक घोटाळा उघडकीस येणार?

पुणे: टेमघर धरण प्रकल्पग्रस्तांसाठी राखीव असलेल्या भूखंडांच्या वाटपात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप पुढे आला आहे. स्थानिक राजकारणी आणि एजंटांच्या संगनमतातून हे भूखंड हडपल्याची चर्चा असून, यामुळे मूळ लाभार्थ्यांना न्याय मिळत नसल्याची भावना प्रकल्पग्रस्तांमध्ये तीव झाली आहे. शासनाने पुनर्वसनासाठी दिलेल्या जमिनींचे वाटप पारदर्शक आणि नियमबद्ध पद्धतीने व्हावे, अशी अपेक्षा असताना प्रत्यक्षात मात्र वेगळीच परिस्थिती दिसत आहे.

अनेक पात्र प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या हक्काचे भूखंड अद्याप मिळालेले नाहीत. काही ठिकाणी बनावट कागदपत्रे तयार करून किंवा नियमांचे उल्लंघन करत भूखंडांचे हस्तांतरण करण्यात आल्याचे आरोप आहेत. एजंटांनी मध्यस्थी करीत मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार केल्याचेही बोलले जात आहे. विशेषतः सत्ताधाऱ्यांशी जवळीक असलेल्या व्यक्तींना प्राधान्य देण्यात आल्याचा आरोप होत असून, त्यामुळे संपूर्ण प्रक्रियेवर संशय



निर्माण झाला आहे.


या प्रकरणामुळे प्रकल्पग्रस्तांमध्ये असंतोष वाढत असून, त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रारी दाखल केल्या आहेत. संपूर्ण भूखंड वाटप प्रक्रियेची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. काही सामाजिक संघटनांनीही या मुद्द्यावर आवाज उठवत पारदर्शक चौकशीची मागणी केली आहे.

तसेच, वाटप प्रक्रियेचा फेरआढावा घेऊन खऱ्या लाभार्थ्यांना न्याय मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, प्रशासनाने या आरोपांची दखल घेत संबंधित कागदपत्रांची तपासणी सुरू केल्याचे सांगितले आहे. प्राथमिक चौकशीत काही अनियमितता आढळल्याची चर्चा असली तरी अधिकृतरीत्या याबाबत माहिती देण्यात आलेली नाही. दोषी आढळल्यास कठोर कारवाई केली जाईल, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. टेमघर प्रकल्पातील भूखंडवाटपातील या कथित गैरव्यवहाराचे पडसाद आता राजकीय वर्तुळातही उमटू लागले असून, याप्रकरणी पुढील घडामोडींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# लोणावळा फिरायला जाताय? ऑनलाईन फसवणुकीपासून सावधान; व्हिला बुकींचा स्कॅम, पर्यटकाची हजारोंना फसवणूक

पुणे । प्रतिनिधी

अभिनेत्री रेखाच्या एका गाण्याचे बोल असे की, लोणावळा , खंडाळा, कोल्हापूरचा पन्हाळा.... त्यामुळे लोणावळ हे ठिकाण पर्यटकांचं आकर्षणाचं ठिकाण बनलं आहे. डोंगराळ प्रदेशातील हिरव्या झाडांच्या गर्द सावलीत, खळखळ वाहणारे झरे पाहून पर्यटक निसर्ग सौंदर्य अनुभवायला लोणावळा सहलीचं नियोजन करतं. महाराष्ट्रासह देशभरातून लोणावळ्यात पर्यटक आनंद घेण्यासाठी येतात. मात्र, गेल्या काही दिवसांत लोणावळ्याच्या नावाने पर्यटकांची ऑनलाईन फसवणूक होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मुंबईतील एका पर्यटकाने ऑनलाईन व्हिला बुकींग गेला, मात्र त्या जागेवर कुठलाही बंगला नसल्याचे प्रत्यक्ष तिथं पोहोचवल्यावर उघडकीस आल्याने आपली फसवणूक झाल्याचे पर्यटकाच्या लक्षात आले.



पर्यटन नगरी म्हणून देशभर प्रसिद्ध असलेल्या लोणावळ्यात सध्या पर्यटकांची फसवणूक करणारा ऑनलाईन 'व्हिला बुकिंग स्कॅम' उघडकीस आला आहे. थंड हवेच्या ठिकाणाचा आनंद घेण्यासाठी दरवर्षी हजारो पर्यटक लोणावळ्यात दाखल होतात. मात्र, आता याच पर्यटकांना लक्ष्य करत सोशल मीडियावर आकर्षक व्हिला आणि बंगल्यांचे फोटो टाकून ऑनलाइन भामटे सक्रिय झाले आहेत.

बुकिंगच्या नावाखाली २० ते २५ हजार रुपयांपर्यंत आगाऊ रक्कम घेतली जाते, इतकंच नाही तर विश्वास बसावा म्हणून संबंधित ठिकाणाचे लाईव्ह लोकेशनही पाठवले जाते. मात्र, प्रत्यक्षात पर्यटक लोणावळ्यात पोहोचल्यावर त्या ठिकाणी कोणताही व्हिला किंवा बंगला अस्तित्वात नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आलं आहे. या वाढत्या फसवणुकीमुळे पर्यटक आर्थिक फटका सहन करत आहेत. तर दुसरीकडे स्थानिक व्यावसायिकांमध्येही चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या स्कॅममुळे लोणावळ्याच्या पर्यटन व्यवसायावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तर, स्थानिक व्यावसायिकांच्या मते, हे स्कॅम लोणावळ्यातील नसून बाहेरील भामट्यांकडून रचले जात आहेत.

अधिकृत वेबसाईटचाचा वापर करण्याचे आवाहन

दरम्यान, या फसवणुकीपासून वाचण्यासाठी पर्यटकांनी ऑनलाईन बुकिंग करताना अधिकृत वेबसाईट्सचाच वापर करावा आणि सतर्क राहावे, असं आवाहन करण्यात येत आहे. ऑनलाईन बुकिंग करताना खात्री करूनच व्यवहार करा, अधिकृत माध्यमांचा वापर करा. माझ्यासोबतही असा ऑनलाइन बुकिंगचा प्रकार झाला, त्यामुळे इतरांनी सावध राहावं असे मुंबईतील पर्यटक मयूर भानुशाली यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

# पुण्यात अनधिकृत बांधकामांवरून संताप; लोहगाव प्रकरणाने महापालिका सभागृह तापले

पुणे: 'अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यापूर्वी मलिदा लाटला जात आहे. ज्यांच्याकडून संबंधितांचे खिसे गरम होतात, त्यांना अभय मिळते अन् सामान्यांच्या घरांवर चालतो बुलडोझर, हा कसला न्याय?' असा संताप व्यक्त करीत लोहगाव आणि नव्याने समाविष्ट २३ गावांमधील अतिक्रमण कारवाईचा मुद्दा सोमवारी महापालिका सभागृहात चांगलाच तापला.

विमाननगर-लोहगाव प्रभागाचे नगरसेवक अनिल सातव आणि रामभाऊ दाभाडे यांनी प्रशासनाला धारेवर धरत डीपी (विकास आराखडा) नसताना नागरिकांनी घरे कुठे बांधायची? असा रोकठोक सवाल उपस्थित केला. या गोंधळामुळे सभागृहात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

१० वर्षे उलटली, डीपी कुठे आहे?

लोहगावसह २३ गावांचा महापालिकेत समावेश होऊन बराच काळ लोटला, तरीही या भागाचा विकास आराखडा अद्याप कागदावरच आहे. गेल्या १० वर्षांपासून डीपी नसल्यामुळे नागरिकांनी गरजेपोटी आपली घरे बांधली. आता त्याच घरांना अनधिकृत ठरवून २४ तासांच्या नोटिसा देऊन ती घरे पाडली जात आहेत. प्रशासनाच्या या मनमानी कारभारामुळे सामान्य नागरिक देशोधडीला लागला आहे, अशी भूमिका अनिल सातव यांनी मांडली. काही ठिकाणी तर नोटीस न देताच थेट कारवाई केल्याचे सांगत सातव यांनी प्रशासनाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

सुनावणीनंतर चित्र होईल स्पष्ट : प्रशासनाचे उत्तर

नगरसेवकांच्या या आक्रमक पवित्र्यानंतर प्रशासनाने आपली बाजू मांडली. 'पूर्वीचा आराखडा रद्द झाल्याने नवीन डीपीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. सध्या बांधकाम परवानग्या नियमानुसारच दिल्या जातात. अनधिकृत बांधकामांवर कारवाई करणे ही आमची जबाबदारी असून, हरकती-सूचनांची सुनावणी पूर्ण झाल्यावर चित्र स्पष्ट होईल,' असे स्पष्टीकरण प्रशासनाकडून देण्यात आले. मात्र, जोपर्यंत डीपी अंतिम होत नाही तोपर्यंत कारवाईला स्थगिती द्यावी, या मागणीवर नगरसेवक ठाम होते.

घरे पाडताना कोणताही विचार नाही : सामान्यांचा आरोप

कारवाई करताना महापालिका प्रशासन दुहेरी निकष लावत असल्याचा गंभीर आरोप रामभाऊ दाभाडे यांनी केला. उच्चभ्रू भागातील आणि बड्या लोकांच्या बांधकामांकडे अधिकारी कानाडोळा करतात; मात्र, आयुष्यभराची पुंजी लावून सामान्यांनी उभारलेली घरे पाडताना कोणताही विचार केला जात नाही. 'जिथे पैसा मिळतो, तिथे कारवाई थांबते,' असा उघड आरोप करीत नगरसेवकांनी या प्रकरणाच्या चौकशीची मागणी केली.

